www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **तरुणांचा बुलंद आवाज** मराठी
# युवक आधार

संपादक - संतोष शिवदास आमले
मुख्य संपादक - भारती आमले  उपसंपादक - श्री विलास गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे  निवासी संपादक- श्री राकेश पाटील  सह संपादक - श्री मुकुंद कांबळे  महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३  अंक : ७७  मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : ८  RNI MAHMAR/2023/89514




## बामणडोंगरीची अंकिता नाईक झाली डॉक्टर!

### महेंद्रशेठ घरत यांनी घरी जाऊन केले अभिनंदन !

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर** : पनवेल तालुक्यातील आणि उलवे नोडमधील बामणडोंगरी गावची अविनाश धावजी नाईक आणि हेमलता अविनाश नाईक यांची कन्या अंकिता नाईक ही नुकतीच एम. एस. (मास्टर ऑफ सर्जरी) डॉक्टर झाली. त्याबद्दल आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी तिचे घरी जाऊन पुष्पगुच्छ आणि 'सुखकर्ता' व 'परदेश प्रवासाची पंचविशी' ही पुस्तके भेट देऊन अभिनंदन केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, रामदास नाईक, अरुण नाईक, प्रीतम नाईक, उत्तम कोळी, अश्विन नाईक आदी उपस्थित होते. त्यांनीही तिचे अभिनंदन केले.



बामणडोंगरी गावचे तत्कालीन समाजसेवक दिवंगत धावजीशेठ गणा नाईक यांची अंकिता नाईक ही नात आहे, तर उरण-कंठवली येथील कीर्तनकार आणि नवी मुंबईत प्रसिद्ध असणारे चार्टड अकाउंटंट (सी. ए.) इ. ए. पाटील यांची ती भाची आहे.यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "आगरी समाजातील मुली उच्चशिक्षण घेऊन नावलौकिक मिळवत आहेत. मुली शिकाव्यात यासाठी मी गेली अनेक वर्षे प्रयत्न करतोय आणि प्रोत्साहन देत आलो आहे. त्यामुळे आगरी समाजाची अंकिता नाईक ही तरुणी स्त्री-रोग तज्ज्ञ झाल्याने मला अतिशय आनंद झाला आहे. मुलींचा सन्मान करण्यासाठी मी नेहमीच पुढाकार घेतला आहे. एकेकाळी भांडणांसाठी प्रसिद्ध असलेल्या बामणडोंगरी गावची तिने मान उंचावली आहे. तिचे आजोबा धावजीशेठ नाईक हे काँग्रेसचे खंदे कार्यकर्ते होते. त्यांनी त्या काळात कॉंग्रेस पक्षाचा पाया भक्कम केला होता."आगरी समाजातील तरुणी स्त्री-रोग तज्ज्ञ झाल्याने परिसरात तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मुंबई विद्यापीठाच्या विधि परीक्षा फेब्रुवारीपर्यंत लांबणीवर

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**मुंबई** : मुंबई विद्यापीठाने एलएलबीच्या तीन वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्र परीक्षा फेब्रुवारीपर्यंत पुढे ढकलल्या आहेत. या परीक्षा डिसेंबरच्या मध्यावर घेतल्या जातात.

विद्यापीठाने सप्टेंबरमध्ये जाहीर केलेल्या परीक्षा अचानक दीड महिने पुढे ढकलल्याने विद्यार्थी आणि महाविद्यालये संभ्रमात पडले आहेत. शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण होत आला असताना आता विद्यार्थ्यांनी पुढील दीड महिने काय करायचे? असा प्रश्न त्यांना




पडला आहे.

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या संचालिका पूजा रौंदळ यांनी दि. ८ सप्टेंबरला काढलेल्या पत्रकानुसार प्रथम वर्षाच्या परीक्षा १५ डिसेंबरपासून सुरू करण्याचे जाहीर केले होते.

मात्र आता मुंबई विद्यापीठाच्या निर्णयानुसार ३ फेब्रुवारीपासून परीक्षा सुरू केल्या जाणार आहेत.

### मन:स्ताप सहन करावा लागणार

**विद्यापीठाच्या या अचानक घेतलेल्या निर्णयामुळे कॉलेजांचे वेळापत्रक पुरते कोलमडले आहे. विद्यापीठाच्या सप्टेंबरमधील वेळापत्रकानुसार महाविद्यालयांनी तयारी केली होती. अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी दिवाळीची सुट्टी रद्द केली. द्वितीय सत्राच्या परीक्षाही जूनमध्ये जाणार आहेत. त्यातून विद्यापीठाचे नियोजन नसल्याने विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागणार आहे. सध्या कॉलेजांतील अभ्यासक्रम शिकवून झाला आहे. त्यामुळे परीक्षा पुढे ढकलण्याचे कारण अस्पष्ट आहे, अशी प्रतिक्रिया विद्यार्थी कार्यकर्ते ॲड. सचिन पवार यांनी दिली.**

### विद्यापीठ म्हणते, प्रवेश उशिरा झाले

**विद्यापीठ शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर तात्पुरते वेळापत्रक जाहीर करते. यंदा एलएलबी तीन वर्षे अभ्यासक्रमाचे प्रवेश उशिरापर्यंत चालले.त्यातून प्रथम सत्राचा अपेक्षित शैक्षणिक कालावधी पूर्ण नव्हता. त्यातून या परीक्षा फेब्रुवारीमध्ये घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे, अशी माहिती विद्यापीठाने दिली.**

## भारताच्या मुख्य न्यायाधीशांना अन्यायग्रस्त जनतेची सलामी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : भारताचे ५३ वे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी जो अन्यायग्रस्त जनतेला न्याय दिला त्याबद्दल सर्व अन्यायग्रत जनतेकडून त्यांचे मी अभिनंदन करतो. त्यांचे अभिनंदन म्हणजे अन्यायग्रस्त जनतेला एक सत्याची सलामी आहे. असे मत पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील कनेरसर गावचे कवी लेखक पत्रकार समाजसेवक अशोकराव टाव्हरे यांनी आजच्या शपथविधी सोहळ्या दरम्यान व्यक्त केले.एका याचिके संदर्भात न्यायमूर्ती सुर्यकांत यांचे कामकाज अनुभवण्याची मला संधी लाभली होती. एप्रिल २०२२



मध्ये फक्त १५ लाखांची उलाढाल असलेल्या यमाई पतसंस्था प्रकरणी पंधरा वर्षानंतर सामाजिक कार्यकर्ते अशोकराव टाव्हरे यांच्या खेड पोलीसांनी गुन्हा दाखल केला होता. तपासात १४ लाख ४२ हजारांची ठेवी यादी, कर्ज दिल्याचे निष्पन्न व कर्ज थकबाकीमुळे पतसंस्था बंद पडल्याचे निष्पन्न झाले होते. राजकीय हेतुने तपास खेड ऐवजी मंचर पोलीस स्टेशनला दिला होता. करोडोंच्या ठेवीचा खोटा आरोप व तपासात दबाव हे मुद्दे मांडल्याने सत्र व उच्च न्यायालयात टाव्हरे यांना अटकपूर्व जामीन मिळाला नाही. टाव्हरे यांनी ॲड सौम्य दत्ता व ॲड विराज कदम यांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली, तेव्हा न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांच्या खंडपीठाने टाव्हरे याना ९ नोव्हेंबर २०२२ रोजी अंतरिम जामीन दिला.२ जानेवारी २०२३ रोजी अंतिम सुनावणी न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमुर्ती माहेश्वरी यांच्या खंडपीठाने १५ वर्षानंतर दाखल केलेला गुन्हा हा संस्था असुनही एकट्यावर गुन्हा दाखल होणे या बाबी राजकीय हेतु स्पष्ट करीत असल्याचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी युक्तीवादावेळी सरकारी अभियोक्ता यांना सुनावले होते.मुंबई उच्च न्यायालयाने खेड पोलीस स्टेशनचे तपासाधिकारी यांना ८ जुलै २०२४ रोजी संस्थेवर अवसायक नेमल्यानंतर दहा वर्षांनी गुन्हा कसा दाखल केला याचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगूनही दाखल न केल्याने माननीय उच्च न्यायालयाने १७ नोव्हेंबर रोजी आरोपपत्र दाखल करण्यास पुढील सुनावणीपर्यंत मनाई केली आहे. भारताचे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेणारे न्यायमूर्ती सूर्यकांत यांचा माझ्या याचिकेतील दोन्ही सुनावण्यांमध्ये आदेश देण्यात मोलाचा वाटा होता, त्यांच्या निर्णयाने सत्य सामोरे आले व उच्च न्यायालयात पोलीस प्रतिज्ञापत्र १६ महिने दाखल करू शकले नाही. साडे तीन वर्षे आरोपपत्र दाखल केले नाही ही बाब निश्चितच राजकीय हेतुने प्रेरित होऊन केल्याचे स्पष्ट करते असे अशोकराव टाव्हरे यांनी सांगितले.

## उरण-पनवेल -पेण पूर्व विभागातील सर्वात मोठी दिंडी निघाली श्री क्षेत्र शिर्डीला !!

**दैनिक युवक आधार**

जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर : केळवणे -पनवेल /२२ नोव्हेंबर २०२५ रोजी ॐ साई राम पदयात्रा मंडळाची उरण पनवेल पेण विभागातून निघणारी श्री क्षेत्र शिर्डी पदयात्रा गेली १६ वर्षांपासून निघत आहे.पूर्व विभागातील ग्रामीण लोकांना दिंडी द्वारे सदगुरु साईबाबांच्या दर्शनाचे पुण्य लाभावे या प्रामाणिक संकल्पनेतून केळवणे गावातील जगन्नाथ हिराजी शिवकर यांनी उरण पनवेल पेण विभागातून ॐ साई राम मंडळाची स्थापना केली. शिस्तबद्ध नियोजन आणि उत्कृष्ट सेवा यामुळे लवकरच या दिंडीची कीर्ती सर्वत्र होत आहे

केलवणे गावातून पूर्व विभागातून ३०० हून अधिक लोक या दिंडीत सामील होतात, दीडशे ते दोनशे लोक त्यांना सोडण्यासाठी सुद्धा या दिंडीत सामील होतात. आपट्या फाट्यावरून दांडफाटा



-खोपोली मार्गे कामशेत ते आलेफाटा असा मार्गक्रमण करीत ही दिंडी शिर्डीला होई पर्यंत हजारचा आकडा पार करते.२२ तारखेला निघणारी ही पदयात्रा दिंडी ३० तारखे पर्यंत शिर्डीला पोहोचते.

## शेडूंग ते बेलवली कडे जाणाऱ्या रस्त्याची डागडुजी करण्याची शेकापची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : शेडुंगपासून ते बेलवली कडे जाणाऱ्या खराब रस्त्याचे डागडूजी करण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस मंडळ सदस्य, पनवेल तालुका वसंत काशिनाथ फडके यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे पत्राद्वारे केली.पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायत भिंगार मधील शेडुंग ते बेलवलीकडे जाणारा रस्ता खराब झालेला आहे. ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. या रस्त्या संदर्भात



अनेकदा फोनवर आणि प्रत्यक्षात पत्र देखील देऊन चर्चा झाली. मात्र अद्यापही या रस्त्याचे डागडुजी करण्यात आलेली नाही. पावसाळा संपला असून गणपती, दसरा, दिवाळी देखील संपली. सध्या लग्नसराई सुरू झाल्याचे दिसत आहे. काही दिवसांनी नवीन वर्ष सुरू होईल असे असतानाही या खराब रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग पाहत नाही. खराब रस्त्यामुळे बाजारहाट करण्यासाठी येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. या रस्त्याची तातडीने डागडुजी होणे गरजेचे असल्याचे वसंत फडके यांचे म्हणणे आहे. येत्या दहा दिवसात रस्ता दुरुस्त झाला नाही तर शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने कार्यालयावर मोर्चा, आंदोलन करावे लागेल असा इशारा वसंत फडके यांनी दिला आहे.

## "सुंदरतेपेक्षा सुरक्षिततेला प्राधान्य!; पाणदिवेत कराटे बेल्ट परीक्षेत मुलींची उल्लेखनीय कामगिरी"

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर । उरण रायगड**

**पाणदिवे, उरण** — आजच्या आधुनिक युगात मुलींना फॅशन, ब्युटी, डिझायनिंग यांसोबतच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे अत्यावश्यक बनले आहे. नाशिकमधील मालेगाव, डोंगराळे गावातील लहान मुलीवरील अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर मुलींना सक्षम बनविण्याची गरज अधिक प्रकर्षाने समोर येत आहे.

याच अनुषंगाने पाणदिवे पुंडलिक रामा पाटील शाळेत दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी गोशिंन रियु कराटे




असोसिएशनतर्फे कराटे बेल्ट परीक्षा पार पडली.

या परीक्षेत उरण तालुक्यातील ५ ते १७ वर्ष वयोगटातील ११ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांना काता, कुमिते, टेक्निक्स आदी स्वसंरक्षण कलांचे प्रशिक्षण देण्यात आले होते. क्षमतेनुसार विद्यार्थ्यांना बेल्ट प्रदान करण्यात आले. यलो बेल्ट प्राप्त करणाऱ्यांमध्ये स्वरा म्हात्रे, विश्रुत गावंड, तोफिक अली, पर्जन्य म्हात्रे आणि प्रार्थना ठाकूर यांचा समावेश आहे.

साक्षी पाटील आणि निशा पाटील यांनी ऑरेंज बेल्ट मिळवला. आद्या ठाकूर व सृजा गावंड यांनी ग्रीन बेल्ट तर वेदा नवनीत पाटील हिला पर्पल बेल्ट देण्यात आला. रुद्र मोहन ठाकूर याला ब्राउन-४ बेल्ट प्रदान करण्यात आला.

परीक्षेसाठी असोसिएशनचे इंडिया अध्यक्ष सिहान राजू कोळी, तसेच सेन्साई गोपाळ म्हात्रे, शंपाय भूषण म्हात्रे आणि शंपाय राकेश म्हात्रे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धांमधील संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

मुली आणि मुले कराटेमार्फत आत्मविश्वास, शिस्त आणि स्वसंरक्षण या गुणांचे बळकटीकरण करत असल्याने समाजात सुरक्षिततेकडे महत्त्वाचे पाऊल टाकले जात असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

मुलांसोबतच मुलीही आता या क्षेत्रात पदार्पण करत आहेत सुरुवातीलाचं या स्पर्धेत मुलींचा ही तितकाच प्रतिसाद मिळाला याबद्दल मुलींचेही तितकेच कौतुक करण्यात आले.

## गुणवंत विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच व प्रशस्तीपत्र वितरण कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : खारघरमधील इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आलेला भव्य कार्यक्रम अजित अडसुळे व उषा अडसुळे यांच्या पुढाकारातून मोठ्या उत्साहात पार पडला.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त 23 नोव्हेंबर रोजी हा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने परिसरातील



गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक यशाबद्दल प्रोत्साहन देत भविष्याची दिशा अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेवक गणेश कडू, किशोर ठाकूर, फुलाजी ठाकूर, दिपक शिंदे, साधना पवार, कल्पेश तोडेकर, संदीप जाधव, संतोष सावंत, नितेश पाटील, संजय शर्मा, समीर कदम, यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक करत त्यांना भविष्यात अधिक मोठे यश मिळावे अशा शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन आणि संचालन करत उपस्थित सर्व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण करण्यात आयोजक यशस्वी ठरले. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी सोहळ्याचा अनुभव लाभल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य दिसून येत होते.

## भाजपा नेते प्रितम म्हात्रेंच्या यशस्वी पाठपुराव्याने रसायनी कॉर्नर ते डिंपल कंपनी रस्ता नूतनीकरण कामाला सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : ग्रामपंचायत तुराडे परिसरातील रसायनी कॉर्नर ते डिंपल कंपनी या महत्वाच्या रस्त्याच्या डांबरीकरण कामाला आज अधिकृत सुरुवात करण्यात आली आहे. स्थानिक नागरिकांच्या दीर्घकालीन मागणीनंतर आणि वाहतूक तसेच जनजीवनावर परिणाम करणाऱ्या रस्त्याच्या अत्यंत खराब परिस्थितीची दखल घेत,भाजपा नेते श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा व यशस्वी मध्यस्थीमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तात्काळ कामाला प्रारंभ झाला.यापूर्वी श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. ०१ पनवेल–रायगड यांना लेखी स्वरूपात स्मरणपत्र देत रस्त्याच्या डांबरीकरणाबाबत तातडीने लेखी आश्वासन देण्याची मागणी केली होती. त्यानंतर झालेल्या पाठपुराव्यानंतर आज



प्रत्यक्ष रस्त्याचे काम सुरू झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.काम सुरू होण्याच्या वेळी मा.पंचायत समिती सदस्य श्री जगदीश पवार , ग्रामपंचायत तुराडेचे मा. सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड , रिया प्रदीप माळी ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.या कामामुळे रसायनी परिसरातील वाहतूक सुलभ होण्यासोबतच नागरिकांना होणारा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. पुढील काही दिवसांत संपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

**"जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेऊन समस्या निकाली लावणे ही आमची कार्यपद्धती आहे. ग्रामपंचायत तुराडेचे मा. सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड, रिया प्रदीप माळी यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पाठपुरावा केला होता. त्या अनुषंगाने आम्ही संबंधित विभागाशी सतत संपर्क ठेवून हे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावे यासाठी प्रयत्न करून आज थांबलेल्या कामाची सुरुवात झाली आहे. लवकरच नियोजित वेळेत सदरचे काम पूर्ण होईल यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत"**

**- भाजपा नेते प्रितम जनार्दन म्हात्रे**
**मा. विरोधी पक्षनेते, (पनवेल महानगरपालिका)**

# आयफोनवाल्यांनाच' मेट्रो सवलत?; दिव्यांगांवरील ही कोणती प्रशासनिक थट्टा!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई /प्रतिनिधी :** मुंबई मेट्रो प्रशासनानं दिव्यांगांसाठी २५ टक्के सवलतीची घोषणा केली... पण अट वाचल्यावर दिव्यांग प्रवाशांनी डोक्यावर हात मारला. कारण ही सवलत मिळते ती फक्त आयफोन वापरणाऱ्या दिव्यांगांना! अँड्रॉइड वापरकर्ते—जे संख्येने सर्वाधिक, आर्थिक क्षमता कमी, संघर्ष अधिक—ते मात्र सवलतीपासून वंचित. त्यामुळे ही घोषणा दिलासादायक नसून दिव्यांगांवरची क्रूर थट्टा असल्याची भावना व्यक्त होत आहे.

"सवलत दिली, पण ती देखील आयफोनवर! आयफोन म्हणजे श्रीमंतांचा फोन—त्याची किंमतच लाख ते दीड लाखाच्या पुढे. मग ही सवलत गरीब, मध्यमवर्गीय, खऱ्या अर्थानं संघर्ष करणाऱ्या दिव्यांगांसाठी नाही का? सरकार आणि मेट्रो प्रशासनाचा मानस नेमका काय?" असा खडा सवाल वरिष्ठ पत्रकार आणि दिव्यांग कार्यकर्ते दिपक कैतके यांनी उपस्थित केला आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशननं ( एमएमआरसी) २३ नोव्हेंबरपासून दिव्यांग प्रमाणपत्र असणाऱ्यांना २५ % सवलत लागू केली. ती मेट्रो कनेक्ट ३ ॲपमधून सक्रिय होते. मात्र एमएमआरसीच्या जनसंपर्क अधिकारी वैदेही मोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार—सध्या सुविधा फक्त आयओएस (ॲपल) वर उपलब्ध, तर अँड्रॉइड अपडेट गुगल प्ले स्टोरवर मंजुरीसाठी अडकलेले. म्हणजे बहुसंख्य दिव्यांग प्रवासी—प्रतीक्षेत, त्रासात, आणि प्रत्यक्ष लाभापासून दूर.

"दिव्यांगांसाठी सवलत देताना आर्थिक वास्तव जाणून घ्यायला हवं होतं. दिव्यांग व्यक्ती आयफोन कुठून आणणार? तांत्रिक अडचण होती तर ती आधी सोडवा... आणि मग घोषणा करा!" अशी संतप्त प्रतिक्रिया कैतके यांनी दिली. त्यांच्यानुसार, मेट्रो स्थानके व गाड्यांमधील रॅम्प, ब्रेल साइनेज, ध्वनी सूचना, प्राधान्य प्रवेश अशा सुविधा आजही अपुऱ्या आहेत. प्रवासासाठी अनेकांना मदतनीसाची गरज लागते. अशा परिस्थितीत केवळ २५% नव्हे, तर १०० टक्के सवलत मिळायलाच हवी.

याच मुद्द्यावर केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी हस्तक्षेप करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे. दिव्यांगांचा आर्थिक संघर्ष, रोजगारातील मर्यादा आणि मेट्रोची गरज लक्षात घेता, "दिव्यांग प्रवाशांना मेट्रो प्रवास पूर्णपणे मोफत द्यावा," अशी त्यांची स्पष्ट मागणी आहे.

सवलतीची घोषणा झाली, अभिनंदनाचे संदेशही फिरले... पण प्रत्यक्ष लाभ? फक्त आयफोनवाल्यांना. उरलेला दिव्यांग समाज—वाट बघत, प्रश्न विचारत, आणि प्रशासनाकडून किमान समान वागणुकीची अपेक्षा करत.कारण दिव्यांगांच्या हक्काचा मुद्दा तंत्रज्ञानाचा नाही—संवेदनशीलतेचा आहे.

# सर्वांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी वेताळेश्वराकडे महेंद्रशेठ घरत यांनी घातले गाऱ्हाणे!

## पनवेलच्या डॉक्टरांसह 200 जणांच्या चमूला महेंद्रशेठ घरत यांनी घडवली जलदुर्गाची सफर!

**दैनिक युवक आधार**

**उलवे,वार्ताहर :** सकाळी साडेआठची वेळ... उरण मोरा जेटीवर चक्क तीन लॉच सज्ज... एका लॉचमध्ये पनवेलमधील डॉक्टर्स आणि दोन लॉचमध्ये एम. जी. ग्रुपचे सहकारी रविवारी गेले होते खांदेरी- उंदेरी या जलदुर्गावर. 17 व्या शतकातील हा जलदुर्ग पाहण्याची सुमारे दोनशे जणांच्या चमूला आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी संधी दिली. अथांग समुद्रात पसरलेल्या खांदेरी-उंदेरीला वेताळेश्वराचे दर्शन महेंद्रशेठ घरत यांनी रविवारी (ता. २३) घडवले.



यावेळी कोळी समाजाच्या पेहरावात मोरा जेटीवरून प्रवासाला सुरुवात होताच ओंकार स्वरूपा... या गणरायाच्या अभंगाने गायक नाना गडकरी यांनी गायनाला सुरुवात केली. त्यानंतर स्वतः महेंद्रशेठ घरत यांनी कोळी गीते, मैत्रीवर आधारित बहारदार हिंदी गाणी गाऊन एम. जी. ग्रुपच्या सहकाऱ्यांसोबत धमाल नृत्य केले. यावेळी साडेतीन तासांच्या सागरी प्रवासानंतर खांदेरी-उंदेरी जलदुर्गावर ब्रास बॅंडच्या तालावर, गुळाल उधळीत नाचत जाऊन महेंद्रशेठ घरत यांनी वेताळेश्वराची विधिवत पूजा केली. त्यानंतर सर्वांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी वेताळेश्वराकडे गाऱ्हाणे मांडले. त्यानंतर सर्वांनी स्नेहभोजन केले.

यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "आमच्या सहकारी मित्रांना घेऊन मी गेली पाच-सहा वर्षे वेताळेश्वराच्या दर्शनाला येतो. यंदा डॉक्टर्स मंडळींना घेऊन गेलो होतो. दरवर्षी नवीन सहकारी जोडले जात आहेत. सर्वांना आनंद मिळावा हीच माझी भूमिका आहे. सर्वांनी मनसोक्त आनंद घेतला, त्यामुळे पर्यटनाची ही परंपरा कायम राखली जाईल."

पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशनचे 50 डॉक्टर्स खांदेरी उंदेरी या जलदुर्गावर गेले होते. संघटनेचे अध्यक्ष डॉ. वैभव मोकल, खजिनदार डॉ. संदेश बहाडकर आणि त्यांचे सहकारी होते. यावेळी डॉ. मोकल म्हाणाले, "आम्ही पहिल्यांदाच खांदेरी उंदेरीला गेलो होतो. दुर्ग स्वच्छता मोहीम हा आमचा हेतू होता. महेंद्रशेठ घरत यांनी आमचे उत्तम नियोजन केले होते. त्यांचे खरोखरच अफलातून व्यक्तिमत्त्व आहे. आम्हा डॉक्टर्स मंडळींना दुर्ग स्वचछतेसोबत त्यांच्यामुळे खूप आनंद मिळाला. आम्ही सर्वांनी मस्त एन्जॉय केले. सागरी किल्ला पाहून आम्ही भारावून गेलो, परंतु काही ठिकाणी किल्ल्याची तटबंदी तुटल्याने त्याकडे केंद्र आणि राज्य सरकारने जातीने लक्ष द्यायची गरज आहे. त्यामुळे पर्यटनही बहरेल आणि रोजगारही उपलब्ध होईल."

"2019 पासून नोव्हेंबर महिन्यात खांदेरी- उंदेरीला जाण्याची परंपरा सुरू केली. वेताळेश्वराच्या दर्शनाने खूप प्रसन्न वाटते, अथांग सागराच्या कुशीत वसलेल्या वेताळेश्वराची आगरी-कोळी समाजावर नेहमीच कृपादृष्टी राहिली आहे. माझ्या आयुष्यातील अनेक कार्य निर्विघ्नपणे पार पडली आहेत," असेही यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी अभिमानाने सांगितले. यावेळी प्राध्यापक प्रमोद कोळी यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

# शेकाप, शिवसेनेला जोरदार धक्का

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला पनवेल तालुक्यात जोरदार धक्का बसला आहे. शेकापचे गुळसुंदे विभाग माजी जिल्हा परिषद सदस्य राजू पाटील, सांगुर्ली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रविशेठ चोरघे, नांदगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच दीपक ठोंबरे, शिवसेना 'उबाठा'चे सांगुर्ली शाखाप्रमुख नितेश पारधी आणि युवासेना अधिकारी अनिकेत पाटील आदींनी समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांनी पक्षात स्वागत केले.श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, जीवन म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य







जगदीश पवार, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, पनवेल दक्षिण मंडल अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पश्चिम मंडल अध्यक्ष रूपेश धुमाळ, माजी नगरसेवक सुनील बहिरा, गुळसुंदे विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, कृष्णा पारंगे, प्रवीण खंडागळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.पनवेल मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण मतदारसंघात आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या माध्यमातून होत असलेला विकास तसेच सक्षम कार्यप्रणालीवर आकर्षित होऊन विविध पक्षांचे पदाधिकारी 'कमळ' हाती घेत आहेत. याच अनुषंगाने शेकापचे माजी जि.प. सदस्य राजू पाटील, माजी सरपंच रविशेठ चोरघे, उपसरपंच दीपक ठोंबरे, शाखाप्रमुख नितेश पारधी, युवासेना अधिकारी अनिकेत पाटील तसेच सोमाटणे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच संजय पाटील, सदस्य गंगाराम पाटील, नामदेव म्हस्कर, भावेश माळी, माजी उपसरपंच संजय डुके, माजी सदस्य अशोक पाटील, कसळखंड ग्रामपंचायतीचे माजी प्रभारी सरपंच अजित पाटील, वावेघर ग्रामपंचायतीचे सदस्य रमेश चव्हाण, माजी सरपंच विनायक राठोड, माजी उपसरपंच नरेश भोईर, संतोष भोईर, माजी सदस्य अर्जुन कातकरी, चांभार्ली गुरप ग्रामपंचायतीच्या सदस्य बेबी म्हात्रे, वावेघर ग्रामपंचायतीचे सदस्य भावेश माळी, शारुबाई चव्हाण, अध्यक्ष प्रेम चव्हाण, उपाध्यक्ष मोतिलाल पवार, खजिनदार रमेश चव्हाण, सुरेश पवार यांच्यासह तुरमाळे, सांगुर्ली, वावेघर, चांभार्ली येथील शेकाप आणि 'उबाठा'च्या कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

# पनवेल-करंजाडे पुलासह रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** भारतीय जनता पक्षाच्या प्रयत्नांमुळेच पनवेल परिसराचा विकास वेगाने होत असून विकासाची गंगा करंजाडे येथे आल्याचे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी काढले

पनवेल महापालिकेच्या वतीने पनवेल आणि करंजाडेदरम्यान गाढी नदीवर बांधण्यात येणाऱ्या 50 कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी नवीन पुलाचे तसेच सिडकोच्या माध्यमातून 14 कोटी रुपयांच्या निधीतून करंजाडे सेक्टर 1 ते 6मधील अंतर्गत रस्त्यांच्या डांबरीकरणाचे भूमिपूजन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. या महत्त्वाच्या कामांच्या शुभारंभामुळे वाहतुकीमध्ये सुलभता येणार असून परिसराचा चेहरामोहरा बदलण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, पनवेल महापालिकेच्या माध्यमातून करंजाडेच्या विकासाच्या दृष्टीने नवा अध्याय लिहिला जात असल्याचे सांगून करंजाडे आणि उलवे नोड पनवेल महापालिकेत समाविष्ट करण्यासाठी आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या पाठपुराव्याची माहिती दिली. मंत्रालयीन स्तरावर कागदपत्रांची पूर्तता पूर्ण होत आली असून लवकरच करंजाडे नोड पनवेल महापालिकेला जोडला जाईल. सध्या पुलाच्या माध्यमातून जोडणी सुरू होत असून हा महत्त्वाचा पूल लवकर पूर्ण व्हावा यासाठी



आपण सर्वजण पाठपुरावा करू, असेही ते म्हणाले.

आपल्या भाषणात आमदार महेश बालदी यांनी, लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे करंजाडे परिसराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले असल्याचे नमूद केले. परिसरात अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा सुरू असून हा पूल पुढील 18 महिन्यांमध्ये करंजाडेवासीयांच्या सेवेत दाखल होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करून जनतेची सेवा करण्यासाठी भाजप तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी जि.प. सदस्य जीवन म्हात्रे, माजी पं.स. सदस्य निलेश पाटील, जगदीश पवार, करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, पनवेल दक्षिण मंडल अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पश्चिम मंडल अध्यक्ष रूपेश धुमाळ, करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, मयुरेश नेतकर, ज्येष्ठ नेते सुभाष म्हात्रे, प्रकाश जितेकर, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, शहर अध्यक्ष संदेश पाटील, वडघर जि.प. विभागीय अध्यक्ष गजानन पाटील, पं.स. अध्यक्ष समीर केणी, गुळसुंदे जि.प. विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे सरपंच सदाशिव वास्कर, प्रकाश पाटील, मनखुश नाईक, महेंद्र गोजे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.


**Best Opportunity For**

- House Wife
- Retired
- Teacher
- Businessman



- We are fastest growing organization
- Work Fulltime or Part time as per your requirement
- No Target, No Investment
- Reward & Recognition
- Opportunity For Domestic & International Trip

Hurry Up Limited Seats

Provident Fund + Medical Benefits
Education: 12th pass to Graduates
Entry Age: 30 years to 65 years

Earn Fixed salary upto Rs.30,000/- & incentives upto 2 lakhs p.m.

**Gauri gaikwad:8898632067**


# ६९० ग्रॅम वजनाच्या अकाली जन्मलेल्या बाळाची मृत्यूशी झुंज यशस्वी

## खारघर येथील मदरहूड हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार - ७८ दिवस एनआयसीयुमध्ये केले उपचार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई वार्ताहर :** प्रसूतिपूर्व गुंतागुंतीमुळे मुदतपूर्व प्रसूती करत अवघ्या २३ व्या आठवड्यात बाळाचा जन्म झाला. जन्माच्या वेळी या बाळाचे वजन केवळ ६९० ग्रॅम होते. मुदतपूर्व जन्म असल्याने त्या बाळाला अनेक शारीरिक समस्या जाणवत होत्या. या बाळावर खारघर येथील मदरहूड हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार करण्यात आले असून डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतर अखेर या बाळाची मृत्यूशी झुंज यशस्वी ठरली. खारघर येथील मदरहूड हॉस्पिटलने केवळ २३ आठवडे आणि ६ दिवसांच्या गर्भधारणेदरम्यान जन्मलेल्या प्रीमॅच्युअर बाळावर यशस्वी उपचार केले. जन्मतः बाळाचे वजन केवळ ६९० ग्रॅम होते. डॉ.अनिश पिल्लई(नवजात शिशु आणि बालरोग तज्ज्ञ, मदरहूड हॉस्पिटल्स, खारघर, नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली टिमने योग्य उपचार करत बाळाला असलेला रेस्पीरेट्री सिंड्रोम, श्वसनक्रिया बंद होणे, हृदयात जन्मजात ऱ्हदयविकार(पीडीए), अशक्तपणा, कावीळ आणि कमकुवत प्रतिकारशक्ती यासारख्या अनेक जीवघेण्या गुंतागुंतांवर मात केली.

एनआयसीयूमध्ये ७८ दिवस उपचार घेतल्यानंतर बाळाचे वजन १.९२ किलो इतके वाढले. त्यानंतर बाळ हळूहळू स्तनपानाचा स्विकार करु लागले तसेच योग्य श्वासोच्छवास घेऊ लागले आणि त्यानंतर या बाळाला घरी सोडण्यात आले. सध्या हे बाळ त्याच्या वयानुसार विकासात्मक टप्पे गाठत असून त्याचे वजन २.५६ किलो इतके वाढले आहे.

मुंब्रा येथील रहिवासी रामा (नाव बदलले आहे) आणि राजेश शिर्के (नाव बदलले आहे) हे जोडपे त्यांच्या पहिल्या बाळाचे स्वागत करताना खूप आनंदी होते, परंतु जन्मानंतर काही क्षणांतच जेव्हा त्यांच्या नवजात बाळाला जगण्यासाठी संघर्ष करावा लागला तेव्हा त्यांच्या पायाखालची जमीन सरकली. गर्भधारणेतील गुंतागुंतीमुळे बाळ कवलचा(नाव बदलले आहे)* अकाली जन्म झाला त्याला ऑलिगोहायड्रॅमनिओस (गर्भधारणेदरम्यान कमी अम्नीओटिक द्रवपदार्थ) आणि आईला झालेला तापाचा संसर्ग झाला होता. स्थानिक रुग्णालयात जन्मावेळी त्याला ऑक्सिजन सपोर्टवर ठेवण्यात आले. विशेष काळजीसाठी त्याला रुग्णवाहिकेतून मदरहूड हॉस्पिटल, खारघर येथील एनआयसीयूमध्ये सुरक्षितपणे हलवण्यात आले.बाळाची अविकसित फुफ्फुसं, नाजूक अवयव, संसर्गाचा धोका, हृदयासंबंधी गुंतागुंत, स्तनपानाचा स्विकार न करणे आणि अकाली जन्मल्याने हाडं आणि रक्तप्रवाहासंबंधी समस्या अशा अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागले. त्याला ऑक्सीजन सपोर्ट, सर्फॅक्टंट थेरपी, पॅरेंटरल पोषण, ट्यूबद्वारे आहार, पीडीए व्यवस्थापन, अँटीबायोटिक्स, पूरक आहार आणि योग्य देखरेखीची आवश्यकता होती.

डॉ. अनिश पिल्लई (नवजात शिशु आणि बालरोग तज्ज्ञ, मदरहूड हॉस्पिटल्स, खारघर, नवी मुंबई) सांगतात की, जेव्हा बाळ १ ऑगस्ट २०२५ रोजी जन्माला आले तेव्हा ते अत्यंत नाजूक होते आणि त्यांचे वजन केवळ ६९० ग्रॅम होते. इतक्या लवकर जन्मलेल्या बाळांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते कारण त्यांचे अवयव पूर्णपणे विकसित झालेले नसतात. बाळाचा श्वासोच्छवास स्थिर करणे आणि संसर्गापासून त्याचे संरक्षण करणे हे आमचे मुख्य आव्हान होते. त्यांची फुफ्फुसं अपरिपक्व होती, म्हणून त्याला ऑक्सीजन सपोर्ट, सर्फॅक्टंट थेरपी आणि नंतर हळूहळू नॉन-इन्व्हेसिव्ह सपोर्टसाठी स्तनपान टाळण्याची गरज होती.

डॉ. अनिश पुढे सांगतात की,जगभरातील आकडेवारी पाहता भारतात अकाली जन्मांची संख्या सर्वाधिक आहे, दरवर्षी जवळजवळ ३.५ दशलक्ष बाळ अकाली जन्म घेतात म्हणजेच १० पैकी १ बाळ अकाली जन्माला येते. अनेक बाळं अशा टप्प्यावर जन्माला येतात जिथे फुफ्फुसं आणि हृदयापासून मेंदू आणि आतड्यांपर्यंत प्रत्येक अवयव अजूनही विकसित होत असतो. यावेळी किरकोळ संसर्ग

देखील जीवघेणा बनू शकतो, म्हणून आमच्या टीमने प्रसंगावधान राखत त्वरीत उपचारास सुरुवात केली. बाळाच्या मेंदूचे स्कॅन, डोळ्यांच्या चाचण्या आणि श्रवण तपासणीचे नियमितपणे निरीक्षण केले गेले आणि कालांतराने सुरुवातीच्या बदलांमध्ये सुधारणा झाल्याचे पाहून उत्साह वाढला. अनेक अडचणींवर मात करत बाळाची प्रकृती हळूहळू सुधारली. बाळाचे फुफ्फुस मजबूत झाले, वेळेवर उपचार केल्याने त्याने ऱ्हदयविकारावरही मात केली, त्याच्या मेंदूतील रक्तस्राव थांबला, पोषक आहाराने त्याच्या हाडांमध्ये सुधारणा झाली आणि अखेर बाळ स्तनपान स्विकारु लागले. अत्यंत कमी वजनाच्या बाळांमध्ये आहार आणि वयानुसार वाढ आव्हानात्मक ठरते. त्यांचे आतडे नाजूक असतात आणि त्यामुळे आहार हळूहळू वाढविला जातो. बाळाचे आतड्यांमध्ये जसजसे मजबूत होतात तसतसे त्याच्या आहारात सुधारणा करण्यात आली जेणेकरून त्याला पुरेशा कॅलरीज, खनिज आणि प्रथिने मिळतील. बाळाला ऑस्टियोपेनिया आणि ॲनिमिया देखील झाला, जे सूक्ष्म प्रसूतीपूर्व बाळांमध्ये सामान्य आहेत आणि दोन्ही पूरक आहार आणि रक्त संक्रमणाने व्यवस्थापित करण्यात आले. ७८ दिवस सतत बाल अतिदक्षता विभागातील उपचारानंतर, बाळाने स्तनपान स्विकारल्यानंतर तसेच वयानुसार विकासात्मक टप्प्या गाठल्यावर त्याला घरी सोडण्यात आले. नोव्हेंबर २०२५ मधील फॉलो-अपमध्ये बाळाचे वजन २.५६ इतके वाढले.

आमचे बाळ अकाली जन्माला आले, जेव्हा आम्ही त्याला पहिल्यांदा पाहिले तेव्हा त्याची प्रकृती आम्हाला चिंता वाटू लागली. मदरहूड हॉस्पिटलच्या टीमने आम्हाला आधार दिला व आमच्या बाळाची पुरेपुर काळजी घेतली. आमच्या बाळाला नवे आयुष्य दिल्याबद्दल आम्ही मदरहूड हॉस्पिटल व त्यांच्या टिमचे मनापासून आभार मानतो.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# लोणी गावाचा गौरव! प्रामाणिकपणाचे अनोखे उदाहरण; युवक महादेव सांगळे यांचा नागरी सत्कार

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे :** लोणी गावातील आदर्श आणि कर्तृत्ववान युवक श्री. महादेव बापूराव सांगळे यांनी आपल्या प्रामाणिक वर्तणुकीने संपूर्ण समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. अहिल्यानगर येथे गुरु गणेश ट्रॅव्हल्समध्ये ड्रायव्हर म्हणून कार्यरत असलेल्या सांगळे यांनी लक्झरी बसमध्ये प्रवास करणाऱ्या एका तरुणीचे हरवलेले रु. 1 लाख 30 हजार रुपये स्वतः फोन करून तिला सुरक्षितरीत्या परत केले.

सापडलेली इतकी मोठी रक्कम कोणत्याही मोहाला न लागता संबंधित मालकापर्यंत पोहोचवण्याचे काम सांगळे यांनी प्रामाणिकपणे पार पाडले. त्यांच्या या कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि आदर्श वागणुकीमुळे संपूर्ण लोणी गावाचा सन्मान वाढला आहे.



त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी आज लोणी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

ग्रामस्थांनी सांगळे यांच्या प्रामाणिकतेचे मनापासून कौतुक करत त्यांना सामाजिक आदर्श ठरल्याचे गौरवोद्गार काढले.

अशा प्रामाणिक तरुणांमुळे समाजात सकारात्मकता आणि मूल्यांचा दीप उजळतो, अशी भावना या प्रसंगी व्यक्त करण्यात आली.

# शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आ. ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांचा पुढाकार

## 'शिव छत्रपती शिक्षक संघटना' दक्षिण रायगड विभाग संपर्क कार्यालयाचा शुभारंभ!

**दैनिक युवक आधार**

**माणगाव वार्ताहर :** दक्षिण रायगड विभागातील शिक्षकांच्या समस्या ऐकून त्यांना तत्काळ न्याय देण्यासाठी शिव छत्रपती शिक्षक संघटना आता मैदानात उतरली आहे. माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या दक्षिण रायगड संपर्क कार्यालयाचे उद्घाटन कोकण विभागाचे शिक्षक आमदार श्री ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते संपन्न झाले.

उद्घाटनाच्या वेळी फक्त औपचारिक भाषणे झाली नाहीत, तर शिक्षकांच्या प्रत्यक्ष समस्या, त्यांचे अनुभव, आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्या सविस्तरपणे मांडल्या गेल्या. आमदार महोदयांनीही त्या सर्व मुद्द्यांना मनापासून ऐकून घेतले आणि तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान शिक्षकांना टप्पा वाढ अनुदान मिळवून दिल्याबद्दल आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी अंशतः अनुदानित शिक्षकांचे प्रश्न, TET परीक्षेतील अडचणी, फरक बिले, थकीत वेतन, वरिष्ठ वेतनश्रेणी, सेवानिवृत्त मुख्याध्यापकांची देयके, ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहाय्यकांच्या समस्या, अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ मान्यता, संच मान्यता दुरुस्ती, शालार्थ प्रणालीतील त्रुटी अशा अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. यातील काही तातडीच्या समस्यांवर शिक्षण उपसंचालक कार्यालय मुंबई, शिक्षणाधिकारी कार्यालय आणि वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी विभागाशी आमदार महोदयांनी थेट फोनवर बोलून अधिकारी वर्गाला त्वरित सूचना दिल्या.



याप्रसंगी शिव छत्रपती शिक्षक संघटनेचे दक्षिण रायगड जिल्हा निमंत्रक राजेंद्र पवार, सहसंपर्क प्रमुख अर्जुन कुशिरे, तसेच माणगाव तालुका अध्यक्ष आदेश सुतार, महाड शहाजी बेरे, पोलादपूर सुनिल शिंदे, श्रीवर्धन राजकुमार मुंढे, म्हसळा कमरुद्दीन बांगी, तळा पोपट कसबे, रोहा नंदकुमार देवळेकर आणि मुरूड तालुका अध्यक्ष सरोज राणे यांचा विशेष सहभाग होता. दक्षिण रायगड विभाग सर्व तालुक्यांतील शिक्षक, मुख्याध्यापक आणि संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दक्षिण रायगडमधील शिक्षक अनेक वर्षांपासून विविध समस्यांशी झुंज देत आहेत.

अशातच हे नवीन संपर्क कार्यालय सुरू झाल्यामुळे शिक्षकांमध्ये नवीन ऊर्जेचा संचार झाला आहे. समस्या समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी संघटना व आमदार महोदय तत्पर असल्याचे यावेळी राजेंद्र पवार यांनी सांगितले. शिक्षकांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या न्यायासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र पवार तर निवेदन आदेश सुतार यांनी केले.

# पनवेल स्थानकात वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा, प्रवाशांची गैरसोय

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** भविष्यातील वाहतकीचे केंद्र असलेल्या पनवेल रेल्वे स्थानकाबाहेर प्रवाशांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्थानकासमोरील जागेची कमतरता, रिक्षाचालकांची मनमानी तसेच पायाभूत सुविधांचा अभावामुळे स्थानकातील प्रवेश त्रासदायक झाला आहे.मध्य रेल्वे, कोकण रेल्वे तसेच मुंबई उपनगरी मार्गावरील पनवेल महत्त्वाचे स्थानक आहे. येथून मुंबई, ठाणे, अंधेरीसह वसई-डहाणू लोकल तर कोकणमार्गावरील सर्व लांब पल्ल्याच्या गाड्या धावतात. सध्या येथे ७ फलाट असून ४ उपनगरी तर ३ लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी वापरले जाते. सिडकोने विकसित केलेल्या स्थानकात नवीन टर्मिनसचे काम सुरू असल्याने भविष्यात दादर, सीएसएमटी, एलटीटीवरील भार कमी होऊन पनवेल जंक्शनचा दर्जा अधिक मजबूत होणार आहे. परंतु दिल्ली-जेएनपीटी कॉरिडॉरमुळे प्रत्यक्षात प्रवाशांच्या गैरसोयी वाढल्या आहेत. स्थानकाबाहेरील जागेअभावी बस, रिक्षा थांबे व्यवस्थित नसल्याने प्रवासी अडचणींचा सामना करत आहेत.पदपथांवरील अतिक्रमणांमुळे मुख्य रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्यास प्रवाशांची गैरसोय होत आहे.कोट: बस डेपो ते स्थानकादरम्यानच्या पदपथांवर झोपडपट्टीधारकांची दुकाने थाटल्यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यावर चालावे लागते. एका बाजूला अतिक्रमण, दुसऱ्या बाजूला रिक्षा उभ्या असल्यामुळे अपघाताचा धोका वाढला डे.पनवेल रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारावर वाहतूक शाखेतर्फे कर्मचारी नियुक्ती केले जात आहे. त्यांच्याकडूव नेहमी कारवाई केली जाते. लवकरच येथे संयुक्त कारवाई केली जाणार आहे.-

# तालुकास्तरीय नवोदय सराव परीक्षेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक राजू शिंदे :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा, केंद्र किर्ला तालुका मंठा येथे दिनांक 29- 11 - 2025 वार शनिवारला तालुकास्तरीय नवोदय सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. या सराव परीक्षा करिता प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी माननीय श्री गोविंद चव्हाण साहेब प्रभारी शिक्षण विस्तार अधिकारी माननीय श्री के जी राठोड साहेब तसेच साधन व्यक्ती श्री संतोष गिऱ्हे सर व अभिमान बायस सर उपस्थित राहणार आहेत. या परीक्षेचे नियोजन माननीय केंद्रप्रमुख श्री लक्ष्मण खरात सर मुख्याध्यापक श्री विजय कांगणे सर शिक्षक श्री निलेश पिसे सर व श्री पंजाब दांदडे सर शाळा व्यवस्थापन समिती दुधा , माजी विद्यार्थी समिती दुधा ग्रामपंचायत दुधा , व गावकरी मंडळी दुधा तसेच , किरला केंद्रातील व तळणी केंद्रातील सर्व शिक्षक बंधू भगिनी यांनी केले आहे . या नवोदय सराव परीक्षा मध्ये प्रथम येणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व इतर 12 विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षीस दिल्या जाणार आहेत तसेच उपस्थित असणाऱ्या सर्व विद्यार्थी व पालकांच्या नाष्ट्याची व्यवस्था गावातील पालक यांच्याकडून केली जाणार आहे त्यामुळे इयत्ता पाचवी मध्ये या वर्षी नवोदयचा पेपर देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी या परीक्षेचा अवश्य लाभ घ्यावा. 13 डिसेंबर 2025 ला होणाऱ्या नवोदयच्या पेपर प्रमाणेच हा नवोदयचा सराव पेपर होईल त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती कमी होऊन विद्यार्थी पुढील परीक्षेला अगदी आत्मविश्वासाने सामोरे जातील.यामुळे या परीक्षेचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे .




# कर्नाळा हद्दीतील कल्हे येथील सुदीप टंडन यांनी दिलेला पर्याय मार्ग आम्हाला हवा मधून नको आदिवासी बांधवांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** ग्रुप ग्रामपंचायत कर्नाळा हद्दीतील कल्हे येथील एव्हरग्रीन नर्सरी चे मालक सुदीप टंडन यांच्या मालकीच्या जागेतून आदिवासी बांधवानी जंगलात जाण्यासाठी रास्ता दिला असून या ठिकाणी मोरटाका नामक आदिवासी वाडी नसल्याचे ग्रामपंचायतने पत्रा द्वारे सांगितले आहे.

या वेळी आदिवासी बांधवाना कडून त्यांच्या मालकीच्या जागेतून मधून रास्ता आम्हाला नको असून सुदीप टंडन यांनी त्यांच्या मालकीच्या जागेत बाजूने स्वतः रास्ता करून दिला तोच हवा आल्याचे सांगीतलें मधून वादग्रस्त रास्ता आहे.



तो त्या न्यायालयात प्रकरण चालू आहे शासकीय सर्वच स्तरातून हा रास्ता त्यांच्या मालकीचा असल्याचे लेखी दिले आहे.

सुदीप टंडन यांनी आदिवासी बांधवाना जंगलात जाण्यासाठी पर्यायी दिलेला रास्ता पक्का करण्यासाठी आमदार महेश बालदी यांनी निधी ही मंजूर केला आहे.

स्थानिक आदिवासी बांधव सुदिन टंडन यांच्या मालकीच्या पार्यावी दिलेलाच रास्ता हवा अशी मागणी केली आहे

# एक अनोखा प्रवास तिचा नी माझा...

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/प्रतिनिधी :** शाळेचा गुणगौरव समारंभ म्हणजे वर्षभर केलेल्या सर्वोत्कृष्ट कामगिरीची बक्षिसाच्या रूपात पोच पावती होय. आणि यावर्षीचा "आदर्श विद्यार्थीनीचा" बहुमान मला मिळाला होता. माझे नाव पुकारल्यावर मी स्टेजवर पारितोषिक घेण्याकरिता गेली तेव्हा मला माझ्या आईची आठवण आली. बक्षीस स्विकारतानाच मुख्याध्यापकांनीही माझ्यावर स्तुतीसुमने उधळली. पण मी मात्र या माझ्याकडे असलेल्या गुणांचे श्रेय माझ्या आईलाच देते. शाळेतील ते बक्षीस स्विकारण्याचं वयच आईची आठवण करुन देणार असतं. माझी आई सुंदर, ती स्वयंपाक छान करते, सर्वांचींच काळजी घेते, आम्हांला चांगल्या चांगल्या गोष्टी शिकवते इत्यादी. अगदी माझी आई निबंध लिहायला सांगितला तर हे असं भरभरून लिहीता येईल तिच्याबद्दल. कारण खरी आई त्या वयात कळलेलीच नसते. आई आईच असते. पण ती आम्हां मुलींचा श्वासच असते, ते आता समजले.


आई हे एक आयुष्यातील असं वलय असतं की ते वाढत्या वयाबरोबरच वाढत असतं. पण नेमकं काय असतं हे शब्दांत साचेबंद करणार तो पर्यंत ते वय निसटलेले असतं. आणि आईवर निबंध आता लिहिणे म्हणजे तो एक बालिशपणाच ठरेल. वाढत्या वयाबरोबर आपल्या जीवनात बाहेरच्या जगातील अनेक वेगवेगळ्या छटा, वेगवेगळ्या निमित्ताने डोकावत असतात. नात्यांचे, मैत्रीचे परिचीत अपरिचीत यामधूनच एखाद्याची जीवनशैली एवढी आवडते की, मग तीच व्यक्ती आपल्या जिवनातील आदर्श व्यक्ती असते. काळांतराने त्याहीपेक्षा अजून एखाद्या व्यक्तीचे वागणे, बोलणे, स्वभाव आवडायला लागतो, मग आपणही तसंच अनुकरण करतो. असं का होतं, तर ते आपल्या विचारांतील अपरिपक्वतेमुळे. क्षणोक्षणी आपले idols ही बदललेले असतात. या सगळ्या वैचारिक चंचलतेमुळे आईचे स्थान मात्र थोडेसे लांबच राहिलेले असते. पण तिची मात्र याबाबत कोणतीही तक्रार नसते.

तिचा कमरेला खोचलेला पदर माझ्या हातात नकळत कधी येतो नी माझ तेही एक खेळणं होत हे समजले देखिल नाही. आणि इथुनच तिच्या नी माझ्या जीवन प्रवासाची सुरूवात होते .....

असं म्हणतात, "जन्म बाईचा बाईचा अन् खुप घाईचा" हीच घाई तर माझ्या जन्माच्या वेळेस झाली. आजीच्या हट्टापायी कोवळ्या वयातच ती आई झाली. त्यावेळी किती मोठ्या दिव्यातून तिला जावे लागले. कारण माझा जन्म झाला नी तिचा पुनर्जन्मच होता तो. त्यात आजी सांगायची, "डोळयांच्या वाती नी हाताचा पाळणा करावा लागतो, तेव्हा कुठे आईपण मिळते." माझ्या आईने मला कशी मोठी केली असेल ते मला आता मी आई झाल्यावरच समजले. आईने माझ्यासाठी किती रात्री जागून काढल्या असतील याच उत्तर आता मिळाले मला.

घरात कुणी पै पाहुणा आला की, लाडातच विचारणार " तु कुणाची ग" पण मी मात्र पटकन उत्तर द्यायचे "मी माझ्या बाबांची" त्यावेळी आईच्या मनावर किती मोठा ओरखडा ओढला गेला असेल याची यत्किंचितही मला कल्पना नसायची. त्यावेळी ती फक्त एवढेच म्हणायची "चल लबाड कुठली".

ती लहानपणी मला माझी प्रतिस्पर्धी वाटायची. एक स्त्री म्हणून माझ्या वडिलांच्या प्रेमाची वाटेकरी होती ती. बालमनाला तेव्हा फारस कळत नव्हतच. पण नंतर मात्र तिचे नी माझे नाते गुळपिठाचे कधी झाले हे कळलेच नाही. सणावारांचे दिवस असले की तिच्या हातात काही जादूची छडी आहे की काय असंच वाटायचं मला. याला कारण सकाळी झोपेतून उठून पहायचे तर सणानुरुप तिचा फराळ तयार असायचा. मग दिवाळी असो वा इतर कोणतेही



सण. हिचे आपले पंचपक्वानाचे ताट तयारच असायचे. मला वाटायचं रात्री झोपण्यापूर्वी तर स्वयंपाक घरातील सगळ आवरून सावरून हीने केले नसेल ना. पण ती तर माझ्यासोबतच झोपली. मग सकाळी उठली कधी नी हे बनविले कधी? दिवाळी पहाटे तर मी उठायच्या अगोदरच तिची रांगोळी तयार असायची. आज मी मात्र आज चार बोटांची रांगोळी काढायची म्हटली तरी वेळच नाही ,नी अशी किती तरी कारणे समोर येतात.

लहानपणी बाबांची लाडकी लेक मी सांगायला काहीच वाटत नसे. पण ते तेवढ्यापुरतेच. तसं पहाता मी तर वाढले आईच्या स्वभावातील करारीपणा, शिस्त यांच्या समवेत. बाबांनी तर थोडासा दम भरला तर लगेच कट्टी असायची. बांबानी बाजारात कोण येतय ?असं म्हणताच क्षणी पुन्हा गालावर कळी खुलायची. बाबांना कुठलीही गोष्ट आणायला सांगितली तर ते नाही म्हणत नसत. माझ्या तोंडून कोणताही शब्द निघायचा अवधी तर बाबा ते आणून देत असत. पण हेच तर आईला खटकत होतं. कारण मुलीचा असा हट्ट पुरविणे तिच्या तत्वात बसत नव्हते. माझ्यापुढे बाबा हवालदिल झालेले चित्र त्या माऊलीला न पटण्यासारखे होते. आता हिला शिस्त लावण्याचे काम माझेच आणि तेही मोठ्या युक्तीने असं तिने ठरविले.

झाले आता ही ट्रेनिंग पण सुरू झाली. मुलीने काय केले पाहिजे याहीपेक्षा तिने काय नाही केलं पाहिजे याची लिस्ट तिच्याकडे खुप मोठी होती. असे कपडे नाही घालायचे, कुणाला उलटून बोलायचे नाही, असं नाही वागायचं नी तसं नाही करायच हा तिचा नाहीचा पाढाच जास्त असायचा. तेव्हा मी चिडून म्हणायचे देखिल "हे काय ग तु सारखी नकार घंटाच वाजवितेस " तेव्हा ती सहजच म्हणायची "अगं तुला नकार पचविण्याची ताकद आली पाहिजे." तेव्हा ते बोलणं माझ्या डोक्यावरून गेले. पण त्या बोलण्याचा अर्थबोध मला आज उमगत आहे.

'शाळा सुटली पाटी फुटली' खरंच शाळा संपली नी कॉलेजच्या मोरपंखी जीवनात पदार्पण केले. पण आता मात्र आईच्या नजरेत एक वेगळीच धार दिसू लागली. ती बुरसटलेल्या विचारांची अजिबात नव्हती. पण जगाचा अनुभव कोळून प्यायली होती. त्यामुळे मैत्री कुणाशी करावी, ती मैत्री किती मर्यादेपर्यंत ठेवावी, मैत्री तील अंतर किती असावे, याविषयीची नियमावली माझ्याकडून अगदी तीने तोंडपाठच करून घेतली होती. आता खरी ती मुलीच्या आईची भुमिका जास्त ताकदीने वठवायच काम करू लागली होती. लहानपणीच्या शिस्तीची जागा आता हुरहुरीने घेतली होती. याच हुरहुरीने तर सातच्या आत घरात येण्याचे बंधन तिने माझ्यावर घातले होते. अगदीच कधी यायला उशीर झाला तर आल्यावर तिचा चेहरा चिंतेने काळवंडलेला दिसायचा. आजही ती माझी अशीच काळजी करीत असते.

तडजोड हा शब्द तीनेच शिकविला. तीही कधी कुठे आणि किती करायची. तीही स्वतःचा आत्मसन्मान सांभाळून. तिच्या प्रत्येक कृतीतून एक नविन शिकवण मिळत असे. भाकरीची उकड घेताना पातेल्याला पिठ न चिकटून देणे, खरकटी भांडी घासताना ओल्या, सुक्या कचऱ्याचे विभाजन करणे, मोदक करताना फक्त पिठाचं एक तरी मुटक करायचं, पोराबाळांचे घर आहे म्हणून करंजी करताना त्याच सारणात भरून एक मोदक करायचा, नी मोदक करताना त्याच चवीची एक तरी करंजी करायचीच. याचा अर्थ बहिणीला भाऊ व भावाला बहिण ही असावीच. या अशा छोट्या मोठ्या उदाहरणातून अगाध ज्ञान तिच्याकडून मिळायचे. राग- रूसवा, मोठ्या माणसांचा मान-सन्मान कसा राखावा कधीमधी असं काहीतरी सांगून संस्कारांची शिदोरीच माझ्यासाठी बांधु लागली होती. मी ही तीच्याकडे पाहूनच अनेक गोष्टी तिच्यासारख्याच करता याव्या असाच प्रयत्न करायचे.

पण आता हळूहळू तिचं आपल एकच "अगं आता तुला लोकांच्या घरी जायचं आहे " असा डायलॉग ठरलेला असायचा. आणि या दरम्यानच्या काळातच माझं लग्नही आई-वडिलांनी ठरवले. पण आता मात्र मला ती थोडीशी बदल्यासारखी वाटू लागली. तिच्या स्वभावात चिडचिडेपणा वाटायला लागला. जन्माला आल्यापासुनचे मायेचे पाश एकदाच एका झटक्यात तोडले तर जास्त वेदना होतील, त्या ऐवजी ते पाश थोडेथोडे सैल करतानाच तीची ही चिडचिड वाढू लागली असं मला जाणवले. सासरच्या परक्या घरात मी लवकर रूळावे म्हणूनच तर हे रेशमी बंध तिने सैल केले असावे.

मुलगी म्हणून तीने माझ्यासमोर माझी स्तुती कधीच केली नाही. एखादा पदार्थ रूचकर झाला तरीही ती म्हणायची, "अगं अजूनही तू यात असं केलं असतंस ना तर हे अजून छान झाले असते." मग मी वैतागायचे "तुला ना माझं मुळी जराही कौतुक नाही."आणि मग मीच रडवेली व्हायचे. मग पुन्हा तीच समजावून सांगत असे "हे तु पुन्हा कर शिकून घे".

एवढ मात्र नक्कीच मी आता तिच्या तालमीत शारिरीक व मानसिक दृष्ट्या कणखर झाले होते. आयुष्यातील प्रत्येक वळणावरील तिच्या बाबतीत लिहीता लिहीता एखादी पावसाची सर अंगावर सरसर पडावी नी मी त्यात नखशिखांत भिजते असं काहीसं झाले. अनेक रात्री जागून माझ्या स्पर्धेची तयारी करणारी आई, गॅदरींगसाठी बसविलेल्या नाचाची रिहर्सल करून घेणारी आई, परिक्षेच्या आदल्या रात्री माझं सगळं दप्तर चेक करणारी आई, प्रत्येक क्षेत्रात माझी लेक चमकायला पाहिजे हा तिचा अट्टाहास, जीवनातील कोणत्याही शर्यतीत तिने मागे पडू नये म्हणून धडपडणारी माझी आई.

आता तर काय मला मुले झाली. त्यांना मी ओरडायचं नाही. मारायचं तर अजिबात नाही. का तर सारखं सारखं बोलून मुले कोडगी होतात. फोन केला तरी मुलांना दमात घेत नाहीस ना ? हा ठरलेला प्रश्न . मग आता हिची शिस्त कुठे गेली? नातवंडाना मात्र झुकतं माप. कारण ती आता आईची आजी झाली होती.

सुट्टीत माहेरी आले तर मला झोप मिळावी, आराम मिळावा म्हणून माझ्या पिल्लांनाही उब देणारी माझी आई. माझ्या सासरी जणू काही मी उपाशीच असते म्हणून मला आवडणारे पदार्थ बनविणारी माझी आई. अजूनही माझ्या केसांना तेल लावून गुंता काढणारी माझी आई. इतकच काय मी माहेरी गेल्यावर तिच्या कुशीत मला झोपायला घेणारी माझी आई.अजून किती रूपात दिसणार? या प्रश्नाचे उत्तर अजूनही मी शोधत आहे.

आई हा कधीही न संपणारा अध्याय कितीही वाचला तरी पाने मात्र तशीच वाटतात. अजुनही खुप वाचायच राहून गेलंय.....

तिचा नी माझा न संपणारा प्रवास माझाच काय पण हा प्रवास सर्वच मायलेकींचा असेल.

## थोडक्यात

### डीमार्ट येथील कॅश ऑफिसर केली रोख रकमेची चोरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल जवळील पळस्पे येथे असलेल्या दि मार्ट येथे कॅश ऑफिसर म्हणून काम करणाऱ्या एका महिलेने कस्टमर कॅश रिटर्न रजिस्टर मधून ७०६८ रकमेची चोरी केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.या ठिकाणी कॅश ऑफिसर म्हणून काम करणाऱ्या एका महिलेने कस्टमर कॅश रिटर्न रजिस्टर मधून एकूण ७०६८ रुपयांची चोरी केल्याची तक्रार स्टोर मॅनेजर यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे. त्यानुसार पुढील तपास पोलीस करत आहेत.

### सखी डिझायनर वेअर मध्ये चोरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : पनवेल शहरातील आनंद नगर परिसर सखी डिझायनर वेअर मध्ये अज्ञात चोरट्याने केलेल्या चोरीत जवळपास ६९ हजार रुपयांची रोख लंपास केल्याची घटना घडली आहे. शहरातील आनंद नगर परिसरात असलेल्या सखी डिझायनर वेअर या दुकानात अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाजा उघडून आत प्रवेश करून दुकानात असलेली ६९ हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली आहे. या घटनेची नोंद [पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### श्री दत्त जयंती निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे नवीन पनवेल येथे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):**अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर जि. नाशिक अंतर्गत श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास केंद्र (दिंडोरी प्रणित), नवीन पनवेल येथे सालाबाद प्रमाणे श्री दत्त जयंती निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे दिनांक 28 नोव्हेंबर ते 5 डिसेंबर 2025 नियोजन केले आहे. या सप्ताह काळात श्री वेदतुल्य गुरुचरित्र पारायण, श्री भागवत,श्री नवनाथ पारायण , श्री स्वामी चरित्र सरामृत ,श्री दुर्गा सप्तशती पठण, 24 तास अखंड प्रहर सेवा सारख्या विविध सेवांचे नियोजन केले आहे. या काळात रोज त्रिकाल स्वामी समर्थ महाराजांची आरती संपन्न होईल, तसेच विविध विषयांवर मार्गदर्शन तसेच विविध समस्यांवर विनामूल्य प्रश्नोत्तरे होतील, दिनांक 4 डिसेंबर रोजी श्री दत्त जयंती उत्सव संपन्न होऊन 5 डिसेंबर रोजी सप्ताहाची सांगता सकाळी 10.30 च्या महाआरतीने होईल. तरी सर्व भाविकांनी या पर्व काळात दर्शनाचा लाभ घ्यावा . श्री स्वामी समर्थ केंद्र ,नवीन पनवेल - मारुती मंदिर, पोदी नं. - 3, सेक्टर -16, नवीन पनवेल. संपर्क - 98195 49743, 9082101668, 99207 26196. येथे साधावा

### पालोद येथे संविधान दिनानिमित्त निबंध स्पर्धा संपन्न



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** संविधान दिनाच्या निमित्ताने दि. 23/11/2025 रोजी सत्यशिल संघटन पालोद आयोजित जागर संविधानाचा यांच्या वतीने भव्य निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये शेकडो विध्यार्थांनी सहभाग घेतला यावेळी जागर संविधानाचा टीमचे अध्यक्ष अविनाश दांडगे, adv.संगम सुर्यवंशी,अजय दांडगे, आकाश गायकवाड, वैभव साळवे, यश दांडगे, संतोष दांडगे, सचिन दांडगे, सागर वाकेकर, आशिष वाघ, प्रेम दांडगे, सुमेध कोतकर, अनिकेत साळवे आदी उपस्थित होते तर पर्यवेक्षक म्हणून शुभम सूर्यवंशी, सागर दांडगे, गजानन दांडगे, राहुल वाकेकर, ऋषिकेश गायकवाड, नितीन दांडगे यांनी जबाबदारी पार पाडली

### ग्राहकाला मारहाण केल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** मोबाईल दुरुस्तीच्या कारणावरून झालेल्या वादात ग्राहकाला मारहाण केल्याची घटना खारघर मध्ये घडली. या प्रकरणी मोबाईल दुकान चालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.अहमद मनिहार असे आरोपीचे नाव असून जयेश चौधरी यांनी मोबाईल रिपेरिंग साठी आरोपीच्या दुकानात दिला होता. मोबाईल दुरुस्ती वेळेत न झाल्याने चौधरी यांनी कारण विचारले असता आरोपी आणि ग्राहक यांच्यात वाद झाला. यावेळी आरोपीने चौधरी यांना धक्काबुक्की आणि शिवीगाळ केली.

# मॉडर्न स्कूल वाशीमध्ये रयत शिक्षण संस्थेची मुख्याध्यापक व लेखनिक कार्यशाळा उत्साहात

## अत्याधुनिक 'सेंटर ऑफ एक्सलन्स' प्रयोगशाळेचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रयत शिक्षण संस्था सातारा आणि रायगड विभाग कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुख्याध्यापक व लेखनिक २०२५-२६ कार्यशाळा आज (दि. २४) वाशी येथील मॉडर्न स्कूलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संस्थेच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि व्यवस्थापन कौशल्यवृद्धीच्या दृष्टीने ही कार्यशाळा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली.

कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व थोर देणगीदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव विकास देशमुख, उपाध्यक्ष जयश्रीताई चौगुले, डॉ. राजेंद्र मोरे, माजी सचिव व महात्मा फुले पनवेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, ज्योत्स्ना ठाकूर, शिबिराचे मुख्य मार्गदर्शक प्रशांत साळुंखे, रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, रायगड उपविभागीय अधिकारी विलास



जगताप, तसेच मॉडर्न स्कूलच्या प्राचार्या सुमित्रा भोसले उपस्थित होते. रायगड विभागातील विविध शाखांतील मुख्याध्यापक, लेखनिक आणि शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालयामध्ये उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक 'सेंटर ऑफ एक्सलन्स' प्रयोगशाळेचे उद्घाटन चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान आणि नवोपक्रमांना चालना देणाऱ्या या प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीस मोठी मदत होईल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यशाळेमध्ये प्रशासनिक कौशल्य, शैक्षणिक नियोजन, शाळा व्यवस्थापन, सहकार्यपूर्ण टीमवर्क, तसेच नवीन शैक्षणिक धोरणांच्या अंमलबजावणीसंबंधी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बदलत्या शैक्षणिक स्वरूपात मुख्याध्यापक आणि लेखनिकांची भूमिका अधिक प्रभावी करण्यासाठी या अभ्यास सत्रांचा मोठा उपयोग होणार आहे. यावेळी मान्यवरांनी रयत शिक्षण संस्थेची दीर्घकालीन परंपरा, कार्यपद्धती, जबाबदाऱ्या, तसेच भविष्यातील शैक्षणिक योजना यावर प्रकाश टाकला. संस्थेने ग्रामीण आणि शहरी भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यात मोलाचे योगदान दिले आहे.

### पनवेल प्रीमियर लीगची आजपासून धडाक्यात सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : पनवेल प्रीमियर लीग (PPL) या लोकप्रिय डे-नाईट क्रिकेट स्पर्धेला आजपासून खारघर सेक्टर २७ येथील आई गावदेवी मैदानात उत्साहात सुरुवात होत आहे. शहर व ग्रामीण भागातील क्रिकेट चाहत्यांमध्ये या लीगबाबत मोठी उत्सुकता असून मैदानावर आजपासून रोमांचक सामने रंगणार आहेत.या लीगमध्ये १५ लाखांहून अधिक रकमेची बक्षिसे देण्यात येणार आहेत. ग्रामीण व शहरी अशा दोन्ही विभागातील खेळाडूंना समान संधी मिळत असल्याने



युवा खेळाडूंमध्ये या स्पर्धेबाबत विशेष उत्साह पाहायला मिळत आहे. समालोचक असोसिएशनचे संस्थापक संदीप वास्कर यांनी दिलेल्या माहितीनुसार, लीगचे थेट प्रक्षेपण युट्युब लाईव्हद्वारे उपलब्ध करून दिले जाणार असून चाहत्यांना घरबसल्या सामना पाहण्याची सुविधा मिळणार आहे. पनवेल समालोचक असोसिएशनच्या माध्यमातून सलग चौथ्या वर्षी या प्रतिष्ठित लीगचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील अनेक खेळाडू या स्पर्धेत आपले नशीब आजमावत असून आगामी क्रिकेटपटूंना व्यासपीठ मिळत असल्याचे आयोजकांनी सांगितले. डे-नाईट फॉरमॅटमुळे सामन्यांची रंगत आणखी वाढणार असून पनवेलमध्ये पुढील काही दिवस क्रिकेटचा उत्सव रंगणार आहे.

### सीकेटी महाविद्यालयात 'क्रीडा व्यवस्थापन' विषयावर विशेष चर्चासत्र!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयात प्लेसमेंट सेल विभाग आणि शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स अँड मॅनेजमेंट (IISM), मुंबई यांच्या विशेष सहकार्याने बुधवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांसाठी 'क्रीडा व्यवस्थापनातील संधी' या विषयावर एक महत्त्वपूर्ण चर्चासत्र आयोजित केले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून IISM, मुंबई येथून श्री. आशिष कुमार पाधी (Outreach As_ sociate) हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा व्यवस्थापन आणि स्पोर्ट्स सायन्स क्षेत्रात करिअरच्या अनेक संधींची माहिती दिली.यावेळी, स्पोर्ट्स मार्केटिंग , इव्हेंट मॅनेजमेंट आणि ॲथलीट मॅनेजमेंट यांसारख्या विविध उप-क्षेत्रांमध्ये यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक अभ्यासक्रम, कौशल्ये आणि भविष्यातील संधी यावर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. 'फक्त खेळणे नव्हे, तर खेळाचे व्यवस्थापन करणे किती फायदेशीर ठरू शकते,' याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

या चर्चासत्राचे आयोजन सीकेटी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे एकूण १५० विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील आणि प्रो. (डॉ.) बी. डी. अघाव (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, समन्वयक) यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम यशस्वी पार पडला.

### प्रश्नमंजुषा स्पर्धेत दुधा शाळेचे यश

**दैनिक युवक आधार**

**राजू शिंदे महाराष्ट्र उप संपादक** : केंद्रस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा शाळेचे दोन्ही संघ विजयी किरला केंद्रांतर्गत घेण्यात आलेल्या केंद्रस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा या शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम गट एक ते पाच मध्ये व दुसरा गट सहा ते आठ मध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे यामध्ये वर्ग



पहिली ते पाचवीच्या गटामध्ये अनिकेत भागवत देशमुख, दिशा रामेश्वर जाधव, अमर सतिष खुळे व वर्ग सहा ते आठ च्या दुसऱ्या गटांमध्ये सार्थक रामेश्वर खुळे,स्नेहल संजय जाधव व भाग्यश्री गोकुळ शिंदे या विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये विचारलेल्या प्रश्नाचे अचूक उत्तर देऊन प्रथम क्रमांक मिळविला त्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्याचे केंद्रप्रमुख श्री खरात सर मुख्याध्यापक श्री कांगणे सर शिक्षक श्री निलेश पिसे सर श्री पंजाब दांदडे सर शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत आणि पालक यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

### जाहीर नोटिस

नमुना एन डी

(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH/46/CC/AUTO/2018/2892 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46AZ5714 चे मालक कै.सखाराम महादू फडके याचं दिनांक 11/06/2022 रोजी निधन झाले आहे.

**मी**

**कमल सखाराम फडके**

मुकाम - बोनशेट, जवळ, ता-पनवेल, रायगड, महाराष्ट्र, -410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**कमल सखाराम फडके.**
**मुकाम-बोनशेट, ता-पनवेल, रायगड,महाराष्ट्र,410206.**

नमुना एन डी

(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH/46/CC/AUTO/2018/2892 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46AZ5714 चे मालक कै.सखाराम महादू फडके याचं दिनांक 11/06/2022 रोजी निधन झाले आहे.

**मी कमल सखाराम फडके**

मुकाम - बोनशेट, जवळ, ता-पनवेल, रायगड, महाराष्ट्र, -410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/ प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**कमल सखाराम फडके.**
**मुकाम-बोनशेट, ता-पनवेल,**
**ायगड,महाराष्ट्र,410206.**

## कार्यालय ग्रामपंचायत, भेंडवी

पंचायत समिती राजुरा जिल्हा परिषद-चंद्रपूर

### निविदा सूचना

क्रमांक 2 सन 2025-26 दिनांक 16/06/2025

ग्राम पंचायत भेंडवी कडून सन २०२०-२६ या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे योजनानिहाय कामाकरिता द्वी लिफाफा पध्दतीने (B-1 TENDER) द्वारा इच्छुक जिल्हा परिषद, चंद्रपूर तथा सा.बां.वि. चंद्रपूर यांचे कडील पंजीबद्ध यथायोग श्रेणीतील कंत्राटदाराकडून निविदा मागवण्यात यत आहे.

| अं. | योजनेचे नाव | बांधकामाचे तपशील | अंदाजपत्रकीय किमत (प्रपत्र ब नुसार) | अनामत रक्कम | निविदा प्रपत्र की | काम पूर्ण करण्याची कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | सामान्य फंड मागास कल्याण | मोजा भेंडवी येथील चंद्र या कंदी यांचे शेत ते गड चांदुर रस्ता पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम | 8,50,000/- | 8500/- | 1000/- | 06 महिने |
| २. | सामान्य फंड मागास कल्याण) | मोजा भेंडवी येथील चंद्र या कंदी यांचे शेत ते गड चांदुर रस्ता पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम | 234017/- | 2000/- | 500/- | 06 महिने |
| ३. | सामान्य फंड मागास कल्याण) | मोजा भेंडवी येथील चंद्र या कंदी यांचे शेत ते गड चांदुर रस्ता पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम | 234017/- | 2000/- | 500/- | 06 महिने |

**निविदेच्या अटी व शर्ती :-**

१) वरील प्रमाणे कामाच्या निविदा द्वी लिफाफा पद्धतीने दि. 16/06/25 ते 23/06/25 पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येईल.
२) वरील प्रमाणे कामाच्या निविदा दि 24/06/25 रोजी दुपारी १२:०० वाजता किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्यानुसार उघडण्यात येईल.
३) निविदा फार्म ग्रामपंचायत कार्यालयातून घ्यावे लागेल व निविदा सादर करतांनी कंत्राटदरांनी त्यांचे संपूर्ण कागदपत्रे उदा. कंत्राटदार पंजीयन प्रमाणपत्र, PANकार्ड, GST प्रमाणपत्र, इन्कम टक्स व GST क्लीयरंस प्रमाणपत्रे जोडणे अनिवार्य राहील.
४) निविदेची अनामत रक्कम D.D. किंवा चेक स्वरुपात स्वीकारण्यात येईल.
५) मुल्यांकन नुसार सर्व प्रकारच्या शासकीय कर कपाती करूनच अंतिम देयक देण्यात येईल.
६) कुठलेही कारण न देता एक किंवा अनेक निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायत देण्यात ने राखून ठेवले आहे.
७) निविदेच्या अटी व शर्ती व सविस्तर माहिती ग्राम पंचायतीच्या सूचनाफलकावर कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

## कार्यालय ग्रामपंचायत, भेंडवी

पंचायत समिती राजुरा जिल्हा परिषद -चंद्रपुर

### निविदा सूचना

**क्र.1 सन २०२६ २६ दिनांक 13/02/2025**

ग्राम पंचायत भेंडवी कडून सन या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे योजनानिहाय कामाकरिता द वि लिफाफा पध्दतीने (B-1 TENDER) द्वरा इच्छुक जिल्हा परिषद, चंद्रपूर तथा सा.बां.वि.चंद्रपूर यांचे कडील पंजीबद्ध यथायोग्य श्रेणीतील कंत्राटदाराकडून निविदा मागवण्यात येत आहे.

| अं. | योजनेचे नाव | बांधकामाचे तपशील | अंदाजपत्रकीय किमत (प्रपत्र ब नुसार) | अनामत रक्कम | निविदा प्रपत्र की | काम पूर्ण करण्याची कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 01) | सामान्य एंड | मौज लाट्रेन गुडा येथे आदवासी सीवगत समोर पेवर ब्लॉक बांधकाम करणे | 3,88,545/- | 3900/- | 500/- | 03 महिने |

**निविदेच्या अटी व शर्ती :-**

१) वरील प्रमाणे कामाच्या निविदाः द.वी लिफाफा पद्धतीने दि. 13/03/25 ते 20/03/25 सुर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येईल.
२) वरील प्रमाणे कामाच्या निविदा दि 21/03/25 रोजी दुपारी १२:०० वाजता किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्यानुसार उघडण्यात येईल.
३) निविदा फार्म ग्रामपंचायत कार्यालयातून घ्यावे लागेल व निविदा सादर करतांनी कंत्राटदरांनी त्यांचे संपूर्ण कागदपत्रे उदा. कंत्राटदार पंजीयन प्रमाणपत्र, PANकार्ड, GST प्रमाणपत्र, इन्कम टॅक्स व GST क्लीयरंस प्रमाणपत्रे जोडणे अनिवार्य राहील.
४) निविदेची अनामत रक्कम D.D. किंवा चेक स्वरुपात स्वीकारण्यात येईल.
५) मुल्यांकन नुसार सर्व प्रकारच्या शासकीय कर कपाती करूनच अंतिम देयक देण्यात येईल.
६) कुठलेही कारण न देता एक किंवा अनेक निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायत देवाडा ने राखून ठेवले आहे.
७) निविदेच्या अटी व शर्ती व सविस्तर माहिती ग्राम पंचायतीच्या सूचनाफलकावर कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

### बोपेगांव आश्रम शाळेला १४ वर्षे आतिल तालुकास्तरीय ४×१००रिले मध्ये सुवर्णपदक

**दैनिक युवक आधार**

**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक विनोद गायकवाड**

**नाशिक** /-आदिवासी विकास विभाग नाशिक अंतर्गत तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा करंजी आश्रम शाळा येथे उत्साहात संपन्न झालेल्या त्यामध्ये शासकीय माध्यमिक आश्रम शाळा बोपेगाव खेळाडु यांनी १४ वर्षातील ४×१०० रिले मध्ये प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल त्यांचे जिल्ह्यातून सर्वत्र अभिनंदन



होत आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रकल्प अधिकारी व सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे (भा. प्र.से) सहाय्यक प्रकल्प अधिकारी पी.एस. सावंत या उपस्थित होत्या त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेबद्दल माहिती व मार्गदर्शन केले या स्पर्धेत एकूण शासकीय व अनुदानित १७ शाळेने सहभाग नोंदवला. तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये मैदानी स्पर्धा,हॉलीबॉल हँडबॉल ,खो-खो,कबड्डी या पाच खेळांचा समावेश होता. या तालुकास्तरीय १४ वर्षातील४×१०० रिले मध्ये स्वर्ण पदक मिळवले व विक्रम भरत राथड,गणेश अशोक धुळे,नरेंद्र सुभाष गारे,ज्ञानेश्वर विष्णू जाधव यांची जिल्हास्तरीय व निवड झाल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक महेंद्र कोतकर,उपशिक्षक जगन्नाथ रंधवे, गोरखनाथ देशमुख, विजेंद्र पाटील, सुनील भागवत,उपशिक्षिका सुलभा अहिरे, प्रतीक्षा पवार, जयमाला भामरे ,अशा डोखे,सीताबाई हडस यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.क्रीडा शिक्षक विलास गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# अल्पसंख्याक नेते, लोकाभिमुख उमेदवार उबेद पटेल यांच्या पॅनेलला जनतेचा पाठींबा

## विकासाचे नवे व्हिजन - नवे चेहरे - नवे नेतृत्व ; उमेदवार उबेद पटेल ,दर्शना आंग्रे,मेघा वाडकर

**दैनिक युवक आधार**

**खोपोली वार्ताहर :** " परिवर्तन विकास आघाडीचे " प्रभाग क्रमांक १० मधील " नव्या नेतृत्वाला प्रचारातून " जनतेचा भक्कम पाठिंबा मिळत असल्याने जनसेवा करण्यासाठी हि एक संधी असून या कार्याला " काल पण - आज पण - उद्या पण " कटिबद्ध असल्याचे सांगत या त्री शक्ती जोरदार प्रचारातून जनसंवाद साधण्यात यशस्वी ठरत आहे. शीळ फाटा येथील त्यांच्या प्रभाग कार्यालयाचे उद्घाटन राष्ट्रवादीचे नेते सुधाकर घारे व डॉ.सुनील पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले असून छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून जोरदार रॅली कार्यालय पर्यंत काढण्यात आली.

शीळ फाटा येथील पाटील,आंग्रे,वाडकर कुटुंबियांच्या लोकसेवेच्या परंपरा अनेक वर्षाची असून उमेदवार म्हणून उबेद पटेल ,दर्शना आंग्रे,मेघा वाडकर सातत्याने जनतेच्या संपर्कात असतात.त्यांच्या प्रभागातील प्रचाराचा नारळ फोडताना हा माझा बालेकिल्ला असून या ठिकाणी अनेक वर्ष हिंदू मुस्लिम एक्याची परंपरा कायम ठेवली असल्याची भावना डॉ. सुनील पाटील यांनी व्यक्त केली.ते पुढे म्हणाले की नगराध्यक्ष पदाला सर्वाधिक मताधिक्य हि आम्ही येथून अनेक वर्षे मिळवून दिलेले आहे .यंदा प्रभागातील जनतेचा कौल



लक्षात घेत लोकमनातील उमेदवार म्हणून उबेद पटेल,दर्शना आंग्रे,मेघा वाडकर यांना संधी देण्यात आली .उबेद पटेल अल्पसंख्याक समाजातील संवेदनशील नेते असून त्यांचे योगदान पाहता, त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत जनतेच्या आग्रहापोटी ते निवडणूक जिंकण्यासाठी सक्षम लोकप्रिय उमेदवार म्हणून ठरत आहे . प्रभागातील बैठकीचे हॉल तसेच शंकर मंदिर परिसर,वसाहतितील परिसरात अनेक मूलभूत सुविधा पोहोचविण्यासाठी त्यांनी आपल्या योगदानातून अविस्मरणीय असे विविध प्रकारे उल्लेखनीय सहकार्य केले.या कार्याची दखल जनतेने घेत प्रभागात यंदा नव्या नेतृत्वाला संधी मिळेल , नगराध्यक्ष पदाच्या व प्रभागातील सर्व नगरसेवक पदाच्या परिवर्तन विकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना माय बाप जनता भरघोस मतदान देऊन विजयी करेल असा विश्वास यावेळी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ. सुनील पाटील यांनी व्यक्त केला.

अल्पसंख्याक समाजातुंन रायगड जिल्ह्यातील नामवंत परिवार म्हणून पटेल यांच्या कुटुंबियांने अनेक वर्षे लोकमनावर राज्य करत निःपक्षपातीने पणे प्रसिद्धी झोतात न येता अनेक विधायक विकासकामे केली. या प्रभागातील विकास कार्याचा महामेरू ठरणारे उबेद पटेल व त्यांच्या पॅनलचे सर्व उमेदवार सहकारी विकासाच्या माध्यमातून प्रभाग १०

शिळफाटा येथे भव्य दिव्य आकर्षक शिवसृष्टी उभारणार, युवक, ज्येष्ठ नागरिक,व्यापारी,विद्यार्थी, खेळाडू,अध्यात्मिक वर्गाला सोबत घेत विकासाचे धोरण आखणार. प्रदूषण, साफसफाई,वाहतूक अडचण व पार्किंगसाठी वाहनतळ उभारणार, व्यापारी व ग्राहक कक्ष, समाजमंदिर, वाचनालय आत्याधुनिक भाजी मार्केट उभारणार ,पर्यावरण व आरोग्याच्या निकषांवर स्मशानभुमी, कब्रस्तान ठिकाणी सोई सुविधा केंद्र ,नाना नानी पार्क व गार्डन तयार करणार, पिण्याचे पाणी ,सांडपाणी नियोजन करणार

रस्ते,गटार बनवत विद्युत दिवे लावणार अश्या अनेक विकास कार्याची संकल्पना ठेवत उमेदवार उबेद पटेल ,आंग्रे व वाडकर कुटुंबीयांनी आपला वचननाम्यात उल्लेख केलेला पाहिले जात आहे .सामजिक कार्याची त्यांची आवड आणि इच्छा शक्ती पाहता त्यांना मिळालेली हि संधी एक योग असून पुढील काळात ते नगरसेवक म्हणून आपल्या" कुशल बुद्धीने " समय सूचकता दाखवित आधुनिक सुविधा ,समस्यांवर मात करत नागरिकांना " विकास कार्याचा डोंगर " उभा करून सोई सुविधा उपलब्ध करून देतील आणि परिवर्तन विकास आघाडीच्या धोरणांना आपल्या प्रचार व संवादातून घराघरापर्यंत पोहोचविण्यात यशस्वी ठरतील असा विश्वास स्थानिक जनतेतून व्यक्त होताना दिसत असल्याने त्यांच्या परिवर्तन विकास आघाडीला थेट नगराध्यक्ष पदाच्या मतदानाचा पल्ला गाठणे सोयीचे पडेल असे चित्र सध्या तरी समोर दिसत आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पाणीपुरवठा विहिरीचे बळकटीकरण कार्याचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे :** तालुक्यातील जरंडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत गावातील पाणीपुरवठा व्यवस्थेला बळकटी मिळावी यासाठी रिसॉर्ट परिसरातील ५५ बोर चे काम हाती घेण्यात आले.या कार्याचे उद्घाटन ग्रामपंचायत सरपंच सौ.स्वाती दिलीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपसरपंच संजय पाटील, मधुकर



पाटील,संजीव सोनवणे,बनेगा तडवी,अमृत राठोड माजी सरपंच,दिलीप पाटील तसेच ग्रामपंचायतचे कर्तव्यदक्ष ग्रामसेवक एस. एस.मंगरुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.या कामामुळे गावातील पाणीपुरवठा अधिक परिणामकारक व नियमित होणार असून नागरिकांच्या पाणी समस्येला मोठा दिलासा मिळणार आहे.ग्रामस्थांनी या उपक्रमाचे स्वागत करून प्रशासनाचे आभार व्यक्त केले.मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे गावाची पाणी व्यवस्था अधिक मजबूत व शाश्वत करण्यास मदत होत असल्याचे सरपंच स्वाती पाटील यांनी यावेळी सांगितले.

# मुदगल परिसरात रोहींच्या कळपाने शेतकऱ्यांचे नुकसान

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे**

**पाथरी:-** तालुक्यातील मुदगल लिंबा विटा कुंभारी वझुर शिवारातील जवळपास १००ते १५० रोहींचा कळप वास्तव करीत असल्याने या शिवारातील शेतकऱ्यांमध्ये आपल्या पिकांच्या नुकसानीच्या धास्तीने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे या बाबींकडे वन विभागाने तात्काळ लक्ष वेधून सदर या प्राण्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे पाथरी तालुक्यातील मुदगल येथे उच्च पातळी बंधारा पाण्याने भरलेला असल्यामुळे या परिसरात यावर्षी चांगला पाऊस झाल्याने नदी नाल्यासह पाणी असल्याने या शिवारात वन्यप्राण्यांना पिण्यासाठी पाणी खाण्यासाठी शेतकऱ्यांची आता रब्बी ची पिके उपलब्ध झाल्यामुळे रोहीं याभागात ठाणं मांडले आहे या रोहींच्या मोठ्या संख्येमुळे शेतकऱ्यांमध्ये आता पुन्हा एकदा मोठे संकट उभे राहिले आहे अगोदरच निसर्गाकडून शेतकऱ्यांची अग्निपरीक्षा घेतली आणि आता या वन्यप्राणी एकदा शेतात घुसल्यास सर्व



पिकांची नासाडी करीत असल्याने शेतकरी वर्ग आर्थिक अडचणीत आला आहे तरी या बाबींकडे वनविभागाने या दोन्हींचा बंदोबस्त करावा अन्यथा शेतकऱ्यांमध्ये वनविभागा विषय संताप दिसून येत आहे

# चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया संस्थेकडून उच्चशिक्षणासाठी भक्कम मदतीचा हात

**दैनिक युवक आधार**

**पेण / दीपक लोके :** गरजू व होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी नेहमी तत्पर असलेल्या चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया (CFI) संस्थेमार्फत यंदाही उच्चशिक्षणासाठी महत्त्वपूर्ण मदत जाहीर करण्यात आली. संस्थेच्या वार्षिक उपक्रमांतर्गत एकूण 137 विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक असलेले धनादेश प्रदान करण्यात आले. आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून दूर राहण्याची वेळ येऊ नये, हा CFIचा मुख्य हेतू या माध्यमातून पुन्हा अधोरेखित झाला.

या प्रेरणादायी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राजू पिचिका, मेधा देवधर आणि स्वाती गांधी



उपस्थित होते. तसेच संस्थेचे सीईओ डॉ. किशोर देशमुख यांची विशेष उपस्थिती लाभली. पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना धनादेशांचे वितरण करण्यात आले आणि या प्रसंगी सभागृहात उत्साहाचे वातावरण पसरले होते.

यानंतर पाहुणे तसेच डॉ. देशमुख यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत उच्चशिक्षण, करिअर नियोजन, ध्येय निर्धार आणि प्रगतीची दिशा याबाबत मौलिक मार्गदर्शन दिले. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास उंचावला.

कार्यक्रमात विद्यार्थी आणि पालकांनीही आपली मनोगते व्यक्त करत CFIच्या सातत्यपूर्ण मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

सीएफआयच्या अशाच उपक्रमांमुळे गेल्या अनेक वर्षांत हजारो विद्यार्थ्यांनी आपले उच्चशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून विविध क्षेत्रांत उच्च पदांवर मजल मारली आहे. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने केवळ स्वतःचे आयुष्य घडवले नाही, तर CFI संस्थेचा लौकिकही वाढवला आहे.

गरजू विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम म्हणजे खऱ्या अर्थाने आधार, आशा आणि उज्ज्वल भविष्यासाठीची मजबूत पायाभरणी आहे. समाजातील प्रत्येक होतकरू विद्यार्थ्याला संधी मिळावी, यासाठी CFI संस्था पुढेही अशाच प्रकारे कार्यरत राहणार आहे.

# दिव्यांग बांधवांच्या विविध प्रश्ना बाबत तहसीलदार यांना निवेदन; मागण्या मान्य न झाल्यास तिव्र आंदोलन करणार – शेख जिलानी

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा तालुक्यातील दिव्यांग व्यक्तीच्या प्रश्नाकडे शासनास्तरातुन तहसीलदार, गटविकास अधिकारी, नगर पंचायत मुख्याधिकारी हे दुर्लक्ष करत असल्याचे आरोप करत दिव्यांग बांधवांनी तहसीलदार यांना निवेदन दिले. दि.०३ डिसेंबर २०२५ दिव्यांग दिना पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास तहसील कार्यालया समोर आंदोलन करण्यात येणार आहे याची दखल तहसीलदार यांनी घ्यावी असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. या वेळी देण्यात आलेल्या निवेदनात पुढील प्रमाणे मागण्या करण्यात आल्या आहेत. दिव्यांग व्यक्तीचे संजय गांधी योजनेचे मानधन १०००/- रुपये हप्ता त्वरीत वर्ग करण्यात यावा., पाटोदा तालुक्यातील बऱ्याच दिव्यांग व्यक्तींना २५००/- रुपये ऐवजी १५००/- रुपये आले आहेत तरी सदरील दिव्यांग व्यक्तीचे



कागदपत्र तात्काळ घेऊन त्यांना उर्वरीत रक्कम त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावी., पाटोदा पंचायत समिती अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना ५ टक्के निधी वर्ग करण्यात यावा करीता दिव्यांग कल्याण विभाग जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालय बीड यांनी आदेश देऊन ही कसल्याही प्रकारची कारवाई केलेली नाही तरी दिव्यांग कायदा २०१६ अंतर्गत संबधीत गटविकास अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी., पाटोदा नगर पंचायत अंतर्गत दिव्यांग व्यक्तीना ५ टक्के निधी वर्ग करण्यात यावा., पाटोदा पंचायत समिती अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा व ज्या दिव्यांग व्यक्तीचे घरकुल योजनेत नाव आलेले आहे त्यांना तात्काळ प्रथम प्राधान्याने घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा., अंत्योदय राशन कार्ड योजने अंतर्गत शासनाच्या पारपत्राकानुसार दिव्यांग व्यक्तीना तात्काळ जाचक अट न देता या योजनेचा लाभ देण्यात यावा., पाटोदा तहसील अंतर्गत संजय गांधी विभाग कायमस्वरुपी तळमजल्यावर घेण्यात यावा., वरील सर्व प्रश्नावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी नसता जागतीक दिव्यांग दिन दि.०३डिसेंबर २०२५ वार बुधवार या दिवशी तहसील कार्यालया समोर योग्य प्रकारचे आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच या आंदोलनामुळे होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी संबधीत कार्यालयावर राहील याची नोंद घ्यावी असे सांगितले आहे.

# सहकार भारती मुंबईच्या वतीने अभ्यास वर्गाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई- प्रविणभाऊ पवार**

सहकार भारती, मुंबई विभाग मुंबई च्या वतीने रविवार दि. २३/११/२०२५ रोजी श्री मुरलीधर मंदिर सभागृह", युनियन बँक ऑफ इंडिया जवळ, हनुमान मंदिर शेजारी , आंबेडकर रोड, सायन( पूर्व ), मुंबई या ठिकाणी सकाळी ८:३० ते सायंकाळी ५:३० या ठरलेल्या वेळेत अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आले होते प्रथम दिपप्रज्वलन व उद्घाटन प्रदेश अध्यक्ष व महामंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. मुंबई अध्यक्ष राहुल पाटील यांनी प्रास्ताविक केले. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके यांनी सहकार्य भारती विषयावर मनोगत केले. प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी सहकार भारती काल आणि उद्या या विषयावर उत्तम मार्गदर्शन केले. तर प्रदेश सहसंघटक मंत्री प्रविण बुलाख यांनी कार्यकर्त्यांची जबाबदारी या विषयावर खुप छान मार्गदर्शन केले. प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव



यांनी कार्यकर्ता शोध- कार्य दुढिकरण- अभ्यास वर्ग या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले.

**कार्यक्रमाचे सूत्रसंचालन**

तानाजी गुजर आणि नितीन पवार यांनी उत्तम प्रकारे केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन व सहकार मंत्र गाऊन कार्यक्रमाची सांगता झाली. या अभ्यास वर्गाला मुंबई विभागातील आठ जिल्ह्यांतील अध्यक्ष महामंत्री उपाध्यक्ष संघटक सह संघटक, महिला प्रमुख सह प्रमुख सह अनेक पदाधिकारी आवर्जुन उपस्थित होते.

# खोपोली नगरपरिषद निवडणुकीसाठी पोलिसांची कडक तयारी; दंगा काबू योजना व रूट मार्चच्या माध्यमातून निवडणुकीत कसून सज्जता

**दैनिक युवक आधार**

**खोपोली वार्ताहर**

खोपोली नगर परिषद निवडणूक 2025 शांततामय, पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त पार पाडण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस प्रशासन या निवडणुकीत अधिक कठोर आणि सक्रिय भूमिकेत उतरले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल व खोपोली पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी शहरातील सर्व प्रभागांना भेट देत निवडणूक यंत्रणेची सखोल पाहणी केली.आजच्या पाहणीदरम्यान डॉ. विशाल नेहुल यांनी कायदा व सुव्यवस्था भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. “निष्पक्ष, निर्भय आणि दबावमुक्त निवडणूक हा पोलीस प्रशासनाचा स्पष्ट हेतू असून, कोणत्याही प्रकारची अनुचित हालचाल सहन केली जाणार नाही,” असा ठाम इशारा त्यांनी दिला. विशेष दक्षता, वाढीव गस्त आणि संशयितांवर बारकाईने नजर ठेवण्याचे आदेशही



त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.2 डिसेंबर 2025 रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी करून सुरक्षेतील त्रुटी तातडीने दूर करण्याचे निर्देश डॉ. विशाल नेहुल यांनी दिले. मतदान केंद्रांची रचना, सीसीटीव्ही नियंत्रण, पोलीस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्थापन, असामाजिक घटकांवरील कारवाई तसेच निवडणूकपूर्व आणि निवडणुकीनंतर ईव्हीएम मशीनची सुरक्षा यांचा त्यांनी काटेकोर आढावा घेतला.डॉ. विशाल नेहुल यांच्या सूचनांनुसार खोपोलीमध्ये पोलीस दलाने दंगा काबू योजना राबवून तसेच रूट मार्च काढून निवडणूकपूर्व वातावरणात कायदा-सुव्यवस्था टिकवून ठेवण्याची तयारी पूर्ण केली आहे. या कारवाईमुळे खोपोलीतील निवडणूक प्रक्रिया अधिक सक्षम, सतर्क आणि पोलीस नियंत्रणाखाली असल्याचे अधोरेखित झाले आहे.या निवडणुकीत कुणालाही गैरप्रकार करण्याची संधी मिळणार नाही, असा ठाम संदेश पोलीस प्रशासनाने दिला आहे.


# विरारमध्ये द्वारकाधीश मंदिर प्राणप्रतिष्ठा महोत्सव

## पाच दिवस धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल विरार नगरी झाली भक्तीमय

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी योगेश साबळे वसई विरार मुंबई**

विरारच्या पूर्वेकडील शिरगाव परिसरातील विवाह आर्किटेक महाविद्यालयाच्या नजीक प्रथम महापौर तथा श्रीकृष्ण भक्त प्रवीणा ठाकूर यांच्या संकल्पनेतून ठाकूर कुटुंबीयांच्या वतीने गुजरात येथील व्याख्यातमय श्री द्वारकाधीश मंदिराची प्रतिकृती ठरावे. अशा भव्यतेने उभारण्यात आलेले आहे. या मंदिराच्या भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला




26 नोव्हेंबर पासून सुरुवात होत आहे. 26 ते 30 नंबर पर्यंत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमाद्वारे हा उत्सव पार पडणार आहे मूर्ती स्थापना व द्वारोद्घाटन आणि विविध धार्मिक विधिसाठीची सर्व तयारी मंदिर परिसरात पूर्ण करण्यात आलेले आहे जगद्गुरु शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्या आगमनाची भक्त उत्सुकतेने वाट पाहत आहेत.

या धार्मिक उत्सवासाठी प्रथम महिला महापौर तथा श्रीकृष्ण भक्त सौ. प्रविणा ठाकूर व माजी आमदार हितेंद्र विष्णू ठाकूर व संपूर्ण ठाकूर परिवार यांनी सर्व भक्तांना जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे .

महोत्सवाचा शुभारंभ 26/ नोव्हेंबर रोजी दुपारी 12. 34 वा. मूर्ती स्थापना प्राणप्रतिष्ठा विधीने होणार असून त्यानंतर पूर्णोहुती आणि सायंकाळी 4 वाजता जगद्गुरु शंकराचार्य च्या करकमालांनी मंदिराचे द्रोणोदार होणार आहे 27 नोव्हेंबर रोजी सकाळी नऊ वाजता त्यांच्या वाचनामृतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

त्याच दिवशी सायंकाळी केरळमधील पारंपरिक पद्धतीने नृत्य तसेच राधाकृष्ण नृत्य प्रस्तुती म्हणजे विकी मुनजी आणि ग्रुप यांच्याकडून सादर केले जाणार आहे 28 नोव्हेंबर रोजी सुप्रसिद्ध गायक अनुप जटोला यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार आहे. ३० नोव्हेंबरला दुपारी बारा वाजता भंडारा व प्रसाद वितरण करण्यात येईल संध्याकाळी सात वाजता देवराज गटवी यांची पारंपारिक गुजराती डायऱ्याने महोस्तवाचा समारोह होणार आहे.

# पाथरी नगरपरिषदेचा गड कोण राखणार...

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी सिद्धांत चिंचाने :** पाथरी निवडणूक मध्ये दिग्गज नेत्यांची शक्ती पणाला पाथरी नगरपरिषदे मध्ये या निवडणुकीत तिरंगी लढत दिसत आहे. यात शिवसेना ( एकनाथजी शिंदे गट ) राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित दादा पवार गट)काँग्रेस पार्टी. या तीन प्रमुख पार्टी मध्ये अटी अटीतटीची निवडणूक होत आहे.कोण आपले वर्चस्व राखून मतदारांना आपल्या बाजूने खेचून नेईल हेच या मतदान प्रक्रियेत बघावे लागेल. पाथरी नगरपरिषदेची निवडणूक सर्वात प्रतिष्ठेची निवडणूक होत आहे.यात बघावे लागेल मागील 35 वर्षांपासून एक छत्र असलेली नगरपरिषद



बाबाजानि दुर्रानी यांच्याकडे होती. पण यापुढे हे समीकरण बदलेले की समीकरण तसेच राहील हे येणाऱ्या निवडणुकीमध्ये लवकरच कळेल. या निवडणुकीत एकनाथ शिंदे यांचे मानसपुत्र असलेले सहीद भैया खान हेही पूर्ण ताकती निशी या निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.तसेच सत्ताधारी आमदार राजेश दादा विटेकर हेही या निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.पाथरी निवडणुकीची होणारी आगामी निवडणूक ही खूप महत्त्वाची ठरणार आहे...

# शेतीच्या निर्णय प्रक्रियांमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे अत्यंत आवश्यक - पी. आर. देशमुख

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** छत्रपती संभाजीनगर येथे दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यस्तरीय संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन स्वयम् शिक्षण प्रयोग (SSP)मार्फत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय कृषी अधिकारी पी. आर. देशमुख उपस्थित होते.




या कार्यशाळेत कृषी विज्ञान केंद्राकडून डॉ.अनिता जिंतुरकर आणि नायब तहसीलदार रोजगार हमी योजना विभागचे गोरखनाथ सुरे आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. कार्यक्रमामध्ये छत्रपती संभाजीनगर व परभणी जिल्ह्यातील महिला शेतकरी सहभागी झाल्या.

प्रमुख पाहुणे देशमुख सर यांनी पिकांचे विविधिकरण आपल्याला पूर्ववत करावे लागेल असा सल्ला दिला. तसेच सेंद्रिय शेती, हवामान बदलाशी सुसंगत शेती, मिश्र पीकपद्धती व कृषीपूरक व्यवसायाचे महत्त्व, आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती त्यांनी स्पष्ट केली. डॉ. अनिता जिंतुरकर यांनी महिलांनी कृषीपूरक व्यवसाय उभा करून आपले आर्थिक उत्पन्न वाढविण्याचे मार्ग सांगितले. यासोबतच नायब तहसीलदार रोजगार हमी योजनेचे गोरखनाथ सुरे यांनी महिला शेतकऱ्यांशी हितगुज साधुन विभागाच्या योजनांची माहिती दिली.

सम्राट कसबे यांनी एस. एस . पी. चे ध्येय, उद्दिष्टे व पुढील दिशा स्पष्ट केली व महिला पुढाकारातून पर्यावरण पुरक शेती या प्रकल्पाची माहिती दिली.कार्यक्रमात एस एस पी चे वैषाली घुगे, शुभम कुमावत, पुष्पा तूपे, ऋषिकेश कसबे, वर्षा आलापुर, सुप्रिया कांबळे, प्रिया राखुंडे, अंजली झाडके, पंकज वैद्य उपस्थित होते. शेवटी महिला शेतकऱ्यांनी सरकारी अधिकारी व विषय तज्ञांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नावरती चर्चा घडवून आणली.

# पेणमध्ये विकासातील अनियमिततेवर संताप; 26 नोव्हेंबरला देवा भाऊंकडून ठोस उत्तरांची मागणी - नंदा म्हात्रे आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**पेण दीपक लोके :** आगामी नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पेण शहरातील विकासकामांतील अनियमितता, भ्रष्टाचार आणि प्रलंबित नागरी प्रश्नांवर नागरिकांनी तीव्र रोष व्यक्त केला आहे. या सर्व प्रश्नांवर भाजपच्या स्थानिक नेतृत्वाने वर्षानुवर्षे दुर्लक्ष केल्याची टीका काँग्रेसच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार नंदा म्हात्रे यांनी केली. "शहराला पाणी नाही, PMAY घरे नाहीत, रस्त्यांचे काम ढिसाळ… मग एवढे वर्षे भाजप काय करत होती?" असा थेट सवाल त्या वेळी नंदा म्हात्रे यांनी केला.

पत्रकार परिषदेत नागरिकांनी PMAY घरांच्या सहा वर्षांपासून प्रलंबित लाभावर तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील पाणीपुरवठा योजना 165–170 कोटींच्या दाव्यांमध्ये अडकली असून, फिल्टरेशन प्लांट कधी उभा राहणार याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. "पाण्याचे आकडे बदलतात, खर्च बदलतो… पण काम मात्र होत नाही. हा पैसा कुठे जातो?" असा प्रश्न देखील नंदा म्हात्रे यांनी उपस्थित केला.

दरम्यान, शहरातील गार्डनची जागा बदलून उभ्या राहिलेल्या व्यावसायिक प्रकल्पांवर



नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया नोंदवली. 5 कोटी रुपयांच्या रस्त्याच्या खर्चाचे 2.5 कोटींवर आलेले अंदाजपत्रक, पथदिवे व निचरा योजनेतील विसंगती, तसेच भाजी मंडईतील अस्वच्छतेमुळे नानासाहेब धर्माधिकारी यांच्या नावाचा होणारा अपमान — या मुद्द्यांवरही नाराजी व्यक्त झाली. धोकादायक ब्रिज, अपूर्ण उड्डाणपूल, बस वळण्याची जागा नसणे आणि विक्रम–मिनिडोर–रिक्षा चालकांच्या स्थलांतराचा प्रश्न यावरही कोणतीही नियोजनबद्ध कृती झाली नसल्याची टीका करण्यात आली.

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या हजारो ठेवीदारांचे पैसे अजूनही अडकून असून, "पैसे कधी मिळणार?" हा प्रश्न पेणकरांच्या मनात कायम आहे. भाजप सत्तेत असूनही या प्रकरणात कोणतीही ठोस कारवाई न केल्याचा आरोप नंदा म्हात्रे यांनी केला.

या सर्व समस्यांवर 26 नोव्हेंबरला पेणला येणारे देवा भाऊ यांनी प्रत्यक्ष येऊन स्पष्ट, लिखित आणि समाधानकारक उत्तर द्यावे, अन्यथा जनतेचा रोष अधिक वाढेल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. "उत्तर द्या, मगच मत मागा," असा कडक संदेश नंदा म्हात्रे यांनी देवा भाऊंना दिला.कार्यक्रमास काँग्रेसचे प्रदेश, जिल्हा आणि तालुका पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यलंडचे भदंत सुमंगल सुदधसो यांची पत्रकार संजीव भांबोरे यांनी भेट घेऊन शांतीवन बुद्ध विहार व भारतातील बौद्ध धम्म यावर केली चर्चा

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा -** आज दिनांक 24 नोव्हेंबर 2025 ला दुपारी 2 वाजता थायलंड येथील सुमंगल सुदधसो यांच्याशी पत्रकार संजीव भांबोरे भेट घेऊन शांतीवन बुद्ध विहार व भारतातील बौद्ध धम्म याविषयी चर्चा केली.पवनी तालुक्यातील चिचाळ विहार पाथरी पुनर्वसन येथे धम्मचारीकेचे आगमन व धम्म रॅलीचे स्वागत करण्यात आले. सकाळी 10.30 वाजता धम्मचारीकेचे शांतीवन बुद्ध विहाराकडे आगमन झाले त्यावेळी पत्रकार संजीव भांबोरे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. दुसऱ्या सत्रात सकाळी 11 ते 12 वंदनीय भिक्खू यांचे भोजनदान घेण्यात आले. तिसरे सत्र 12.30 ते 2 वाजे ध्यानसाधना कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचप्रमाणे धम्मदेशना व दैनंदिन जीवनात बुद्ध धम्माचे महत्त्व यावर चर्चासत्र तसेच प्रश्नोत्तराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता.चौथे सत्र दुपारी 2.30 ते 3 वाजता दानपारमिता व आशीर्वाद, समापन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी शांतीवन बुद्ध



विहाराचे संचालक जीवनबोधी बौद्ध, समाधान तिरपुडे, गंगाधर गजभिये, विनय ढोके, प्रशांत बडोले, गुलाब घोडसे, राजकुमार वाहने,सुरेश उके, एडवोकेट दामले सरकारी,लता भांबोरे, सीमा मेश्राम, व असंख्य बौद्ध उपासक उपासिका यांनी सहकार्य केले.

# दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेच्यावतीने सेलु तहसीलदार यांना दिव्यांग पेंशन संदर्भात उपोषणाचे निवेदन

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** : आज सेलु तहसील येथे दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेच्यावतीने सेलु तहसीलदार यांना दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेचे जिल्हाध्यक्ष गुलाबराव खेडेकर तालुकाध्यक्ष डिगांबर घोळवे यांच्या नेतृत्वात दिव्यांगांच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले यामध्ये शासनाच्यावतीने दिव्यांगांना प्रतिमहा 2500 रुपये पेंशनची घोषणा होऊनही सेलु तालुक्यातील 70% दिव्यांगांना 1500 रुपये पेंशन त्यांच्या खात्यावर पडत आहे तर काही दिव्यांगांना पेंशनच पडत नाही,तसेच सदर घोषणा होऊनही बराच कालावधी होऊन गेलेला असताना देखील सेलु तालुक्यातील अनेक दिव्यांग बांधव अद्यापही सदर पेंशन रकमेपासुन वंचित आहेत तर काही बांधवांना प्रतिमहा केवळ रुपये 1500 जमा होत आहेत

याबाबत आम्ही दिव्यांग बांधवांनी तहसील कार्यालयात जाऊन तहसीलदार साहेबांना दोन तीन वेळेस भेटुन याबाबत माहिती दिलेली असताना तहसीलदार साहेबांनी सर्वांना 2500 रु जमा होतील असे सांगितले होते तरीही या नोव्हेंबर महिन्यात पण दिव्यांगांना 1500 रुपये एवढीच पेंशन जमा झाली आज मे तहसीलदार साहेबांना तालुक्यातील शेकडो दिव्यांग बांधवांनी भेटुन या महिन्यात जर मागच्या ऑक्टोंबर महिन्याचे व नोव्हेंबर महिन्याचे राहिलेले प्रत्येकी 1 हजार रुपये असे



दोन्ही महिन्यांचे सर्व दिव्यांग बांधवांचे 2 हजार रुपये आमच्या दिव्यांगांच्या खात्यावर जमा नाहि झाले तर आणि प्रत्येक महिन्याची 2500 रुपये पेंशन जमा झाली नाहि तर सेलु तहसील कार्यालयासमोर दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेच्यावतीने पुढील 15 दिवसानंतर उपोषण करण्यात येईल असे सांगितले

यावेळी दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेचे जिल्हाध्यक्ष गुलाबराव खेडेकर,तालुकाध्यक्ष डीगांबर घोळवे,तालुकासंघटक बालासाहेब मातने,शिवप्रसाद ठोंबरे,रामेश्वर पौळ,रामचंद्र बरसाले,शिल्पा घोडे,उषा गात,पांडुरंग गात,सुधाकर भोगावकर,पंढरीनाथ गात,दिपक शिंदे,सुरेश बरसाले,मधुकर काळे,अशोक कटारे,सुंदर पवार,मिराबाई पावडे,दिपक कटारे,पांडुरंग आघाव,कैलास निर्वळ,धोंडीराम शहाने,जनार्दन शिंदे,निशिकांत पुंगळे,दिनकर शिंदे,संभाजी अवसारे,परमेश्वर जाधव,काशीनाथ कोरे,अंकुश पावडे,अमोल दयने,गणेश खरवडे,इंद्रजीत गवारे,शिवराज डुमे,शिवरुद्र क्षीरसागर,शेख आलिम,तनविर शेख,विष्णु रोकडे,रामेश्वर वाघ,आराध्या राठोड,माणिक मगर,रामकिशन देशमुख,रुपाली कुटे आदि दिव्यांग बांधव व दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते...!

# लाऊड कॉन्सर्ट या सांगितिक कार्यक्रमात चोरटयांनी केला हात साफ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** खारघर येथे दोन दिवसांच्या होणा-या रोलींग लाऊड कॉन्सर्ट या सांगितिक कार्यक्रमात चोरट्यांची चांदी झाली आहे. या कार्यक्रमाचे महागडी प्रवेशिका शुल्क असूनही हजारोंच्या संख्येने खारघरमध्ये तरूणवर्ग आला होता. मोठ्या आवाजातील सांगितिक कार्यक्रमात चोरट्यांनी शिरून साडेदहा लाख रुपयांचे सोने चोरी केल्याच्या तक्रारी खारघर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली. खारघर उपनगरातील सेक्टर ३१ येथे रोलिंग लाऊड इंडिया हिपहॉप म्युझिक फेस्टिव्हल साजरा झाला. पाच ते पन्नास हजार रुपये प्रवेशिका शुल्क असलेल्या या कार्यक्रमासाठी प्रेक्षकवर्ग सुद्धा त्याच उच्चभ्र घराण्यातील मुले व मुली होते. अखेरच्या क्षणात राज्य उत्पादन शुल्क विभागाची तात्पुरत्या स्वरूपात परवानगी मिळवून मद्यविक्रीचे स्टॉल येथे आयोजकांनी उभारले होते. हजारोंच्या संख्येने देशातील विविध शहरातून येथे तरूणवर्ग आला होता. कार्यक्रमातील कर्कश आवाज आणि तरूणांईचा जल्लोष यामध्ये चोरट्यांनी प्रेक्षकांच्या आभुषणावर डल्ला मारला. खारघर पोलिसांकडे प्रेक्षकांनी दिलेल्या तक्रारीमध्ये रविवारी सायंकाळी ६ ते १० वाजण्याच्या दरम्यान सोन्याचे दागीने चोरण्याचे प्रकार घडले. मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने एकमेकांना खेटून असलेल्या प्रेक्षकांच्या गळयातून अक्षरशा सोनसाखळी खेचण्यात आल्या. अशा चार वेगवेगळया व्यक्तींच्या गळयातून १० लाख ५० हजार रूपये किमतीच्या सोनसाखळया चोरीस गेल्या आहेत. खारघर पोलीस चोरट्यांचा शोध घेत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांनी दिली. या कार्यक्रमांत विझ खलिफा, डॉन टोलिव्हर (अमेरिका), सेंट्रल सी (यूके), तसेच करण औजला, दिव्य आणि हनुमानजाती (भारत) यांच्या सहभागाची घोषणा आयोजकांनी केली होती. या कार्यक्रमामुळे खारघरच्या स्थानिक रहिवाशांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागला. शनिवार व रविवार हे दोन दिवस सार्वजनिक सुट्टी असले तरी रात्रीच्यावेळी अभुतपूर्व कोंडी होती. वाहतूक पोलीस व खारघरचे स्थानिक पोलीस हीच कोंडीतून वाहतूक नियमनासाठी काम करताना दिसले. कार्यक्रमाची वेळ रात्री १० पर्यंतची असली तरी कार्यक्रमाच्या सूरक्षेचा ताण मध्यरात्रीपर्यंत पोलिसांना सहन करावा लागला. विशेष म्हणजे ज्या मैदानावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने रोलिंग लाऊड कॉन्सर्टसाठी तात्पुरती मद्यविक्रीची परवानगी दिली. त्याच मैदानात अनेक अध्यात्मिक व धार्मिक कार्यक्रम यापूर्वी झाले आहेत. स्थानिक नागरिकांचा या ठिकाणी मद्यविक्रीच्या स्टॉलच्या तात्पुरत्या स्वरूपातील परवान्याला सुद्धा विरोध होता. परंतू विना वाद हा फेस्टिव्हल साजरा होण्यासाठी अखेरच्या क्षणाला मद्यविक्रीची परवानगी देण्यात आली.

# सटाणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची परिवर्तन सभा, पुनद पाणी प्रश्नावर भाष्य करत; भ्रष्टाचाराचा आरोप

**दैनिक युवक आधार**
**बागलाण तालुका प्रतिनिधी**

**दिपक गायकवाड** : सटाणा नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचारासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत सटाणा येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.छत्रपती शिवाजी महाराज, बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर अनंत दिघे यांच्या प्रतिमेचे पूजन करून सभेला दुपारी सुरुवात झाली. उपमुख्यमंत्री यांनी प्रचाराची सुरुवात अहिराणी भाषेतून केली बागलाणचे आराध्य दैवत संत शिरोमणी यशवंतराव महाराज त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नगरीत मी आज आलो असून मागील नगरपरिषद निवडणुकीत निवडून दिलेल्या नगराध्यक्ष,नगरसेवक यांच्या कामावर नाराजी व्यक्त करत, ह्या निवडणुकीत थेट नगराध्यक्ष पदाचे उमेदवार श्रीमती हर्षदा राहुल बाबा पाटील यांना व धनुष्यबाण (शिंदे




गट) या निशाणीवर उभे असलेले उमेदवार यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आव्हान मतदारांना केले यावेळी एकनाथजी शिंदे यांनी लाडकी बहीण योजना कायम चालू राहील अशी ग्वाही दिली तसेच सटाणा शहरात नागरिकांना भेडसावत असलेल्या समस्या रस्ता बायपास, उद्यान ,गार्डन, पुनद पाणी प्रश्न, ग्रीन जिम, साक्री-शिर्डी महामार्ग, कचरा मुक्त व सुंदर सटाणा करण्याचे आश्वासन दिले.परिवर्तन सभेत मुख्यमंत्र्यांचा उपस्थित अनेकांनी शिंदे गट शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला.यादरम्यान नगरसेवक पदाचे उमेदवार राहुल बाबा पाटील यांनी पुनद पाणी प्रश्नावर भाष्य करत;५४ कोटीच्या योजनेत भ्रष्टाचाराचा आरोप करीत नगर विकास खात्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. माघारीनंतर अधिकृत पक्षाच्या उमेदवारांना पक्ष चिन्ह मिळाल्यामुळे प्रचारास जोरदार प्रारंभ केल्याचे दिसून येत आहे परंतु अपक्ष उमेदवारांना अद्याप चिन्हाची अधिकृत वाटप झाली नसल्यामुळे त्यांना मतदारांपर्यंत कसे पोहचावे याची काळजी पडत आहे. तर नगरपरिषद निवडणुकीत जातीपातीच्या राजकारणाला महत्व प्राप्त होत असल्याचे चित्र दिसत असून विकास, व्यक्ती यापेक्षाही जातीय समीकरणा पलीकडे नाही हे म्हणणे वावगे ठरणार नाही.

थेट नगराध्यक्ष पदासाठी सटाणा नगर परिषदेत ३ उमेदवार तर २४ जागांसाठी ७४ उमेदवार रिंगणात असून भाजपने सुरुवातीलाच दोन उमेदवार बिनविरोध निवड करत खाते उघडले आहे.




# बेघर नागरिकांना मायेची उब

## स्व. मधुकरराव भगत शहरी व ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने ब्लॅंकेट वाटप

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी / राजु गायकवाड** : थंडीत कोणाच्याही जगण्यात अडथळा येऊ नये या सामाजिक बांधिलकीतून स्व. मधुकरराव भगत शहरी व ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था, बेलोरा (ता. पुसद) यांच्या वतीने काल रात्री बेघर व गरजू नागरिकांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. या उपक्रमात संस्थेचे अध्यक्ष श्री. राजकुमार भगत यांच्या पुढाकारामुळे पुसद शहरातील विविध भागांतील बेघर,




वृद्ध व गरजू बांधवांना मदत पोहोचवण्यात आली. अचानक वाढलेल्या थंडीच्या पार्श्वभूमीवर या सेवा कार्याचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. अध्यक्ष राजकुमार भगत यांनी सांगितले की, "गरजू नागरिकांना उबदार आधार देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

आगामी काळात संस्था अशा सामाजिक उपक्रमांना अधिक गती देणार आहे." या उपक्रमात विशाल डाके ,अश्विन कांबळे, व संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# कुकाणा येथे २५ नोव्हेंबर रोजी भव्य नोकरी मेळावा तसेच लाडक्या बहिणींसाठी शासकीय योजना मेळाव्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधी:- (लखन वाल्हेकर)**

**कुकाणा (ता. नेवासा) :** येथे येत्या २५ नोव्हेंबर रोजी भव्य नोकरी मेळावा आणि विविध शासकीय योजनांचा मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्याबद्दल स्थानिक युवक-युवतींमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. हा उपक्रम *माननीय श्री. अब्दुल भैया शेख* यांच्या सौजन्याने आयोजित होत आहेतालुक्यासह परिसरातील सुशिक्षित युवकांच्या सशक्तीकरणासाठी आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात देशातील अनेक नामांकित




कंपन्या सहभागी होणार आहेत. रोजगाराच्या विविध पदांसाठी विद्यार्थ्यांची निवड प्रक्रियाही याच ठिकाणी पार पडणार आहे. तसेच उपस्थित युवकांना विविध शासकीय योजनांची माहिती कार्ड वाटप, जॉब कार्ड वाटप, आरोग्य कार्ड वाटप वितरण, मोफत KYC, शेती अनुदान तसेच नुकसान भरपाई,डोल व कूपन साठी विशेष टेबल लावण्यात येणार आहे.

भैय्या सामाजिक प्रतिष्ठान च्या वतीने हा मेळावा साई श्रद्धा लॉन्स, कुकाणा येथे सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत होणार आहे. अधिकाधिक युवक-युवतींनी व लाडक्या बहिणींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी आणि तरुणांना दिशा देण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन महत्त्वाचे ठरणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# '१२० बहादूर' प्रदर्शित होण्यापूर्वी चित्रपटातील बीटीएस व्हिडिओ आला समोर



**मुंबई :** एक्सेल एंटरटेनमेंट आणि ट्रिगर हॅपी स्टुडिओज '१२० बहादुर' हा चित्रपट उद्या, २१ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. '१२० बहादुर' चित्रपटाचा टीझर आणि गाणी प्रदर्शित झाल्यानं प्रेक्षक चित्रपटाची आतुरतेनं वाट पाहत आहेत. या चित्रपटाच्या ट्रेलरनं उत्सुकतेला आणखीनच बळकटी दिली आहे. या चित्रपटात भारतातील सर्वात मोठ्या युद्धांपैकी एक धाडसी, प्रेरणादायी आणि पूर्वी कधीही न ऐकलेली कहाणी दाखवली जाणार आहे. '१२० बहादुर' चित्रपटामध्ये भारतीय सैनिक ३,००० चीनी सैन्याविरुद्ध उभे राहतात. चित्रपटाचे प्रदर्शन जवळ येत असताना, चित्रपटाच्या चित्रीकरणाचा एक बीटीएस व्हिडिओ प्रदर्शित करण्यात आला आहे, ज्यामध्ये चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान टीमला किती कठीण परिस्थितीचे सामना करावा लागला याबद्दल दाखविण्यात आलं आहे.



**'१२० बहादूर' चित्रपटामधील व्हिडिओ आला समोर :** '१२० बहादूर'चा बीटीएस व्हिडिओ आणि कठोर परिश्रम पाहून आता अनेक चाहते टीमचं कौतुक करताना दिसत आहेत. या चित्रपटाच्या टीमनं लेहच्या उंच पर्वतांमध्ये अत्यंत थंडीत चित्रीकरण केलंय. याशिवाय, वाळूच्या वादळांमुळं देखील शूटिंगचं काम आणखी कठीण झाल्याचं देखील व्हिडिओमध्ये दिसत आहे. या चित्रपटाच्या टीमनं एक विस्तीर्ण बर्फाळ क्षेत्र तयार केले आणि कोणतेही निमित्त न ठेवता शूटिंग पूर्ण केलं. व्हिडिओमध्ये कलाकारांनी प्रचंड ताकद आणि परिश्रम दाखवले, जणू ते खरोखरच्या युद्धात आहेत. पडद्यामागील हा व्हिडिओ पाहिल्यानं चित्रपट पाहण्याचा आनंद आणखी वाढले असं अनेकांना वाटत आहे. १२० बहादूर हा चित्रपट १९६२ च्या युद्धादरम्यान लढलेल्या प्रसिद्ध रेझांग ला युद्धात भारतीय सैन्याच्या १३ व्या कुमाऊं रेजिमेंटच्या १२० सैनिकांच्या अविश्वसनीय शौर्याचे चित्रण करतो.

**'१२० बहादूर' कधी होणार रिलीज चित्रपट :** या चित्रपटात फरहान अख्तर मेजर शैतान सिंग भाटी (पीव्हीसी) ची भूमिका साकारत आहे, ज्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह प्रत्येक संकटाचा सामना केला आणि भारतीय सैन्याच्या इतिहासातील सर्वात संस्मरणीय लढाईपैकी शौर्याचे उदाहरण दिले. या चित्रपटाच्या केंद्रस्थानी एक शक्तिशाली ओळ आहे- "हम पीछे नहीं हटेंगे," ही ओळ अटल संकल्प आणि अटल देशभक्ती प्रतिबिंबित करते. '१२० बहादूर' हा चित्रपट रजनीश रेजी घई दिग्दर्शित आणि रितेश सिधवानी, फरहान अख्तर (एक्सेल एंटरटेनमेंट) आणि अमित चंद्रा (ट्रिगर हॅपी स्टुडिओ) यांनी निर्मित केला आहे. हा चित्रपट २१ नोव्हेंबर २०२५ रोजी रुपेरी पडद्यावर



# सोनम कपूरनं दुसऱ्या गरोदरपणाची केली घोषणा


बॉलिवूड अभिनेत्री सोनम कपूर आता सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. अनिल कपूरची मुलगी वयाच्या ४०व्या वर्षी दुसऱ्यांदा आई होणार आहे. 'रांझणा' या चित्रपटातील अभिनेत्रीनं सोशल मीडियावर एका अनोख्या शैलीत तिच्या गरोदरपणाची घोषणा केली. सोनम कपूरनं गुरुवारी इंस्टाग्रामवर तिच्या बेबी बंपचे काही फोटो शेअर केले आणि लिहिलं, 'आई.' इतकेच नाही तर तिनं सोशल मीडियावर तिचे दुसरे मूल कधी जगात येणार आहे याबद्दलही माहिती आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. आता सोनम कपूरची ही पोस्ट पाहिल्यानंतर अनेकजण तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत. याशिवाय अभिनेत्रीनं तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर फोटो शेअर करत लिहिलं, 'कमिंग स्प्रिंग २०२६.'

दरम्यान पुढील वर्षी वसंत ऋतूमध्ये सोनम आणि आनंदच्या आयुष्यात एक फुल उगवणार आहे. दरम्यान ऑगस्ट २०२२ मध्ये, सोनम आणि पती आनंद आहुजा हे पालक बनले होते. या दोघांना ३ वर्षांचा मुलगा आहे. दरम्यान आनंदशी लग्न केल्यानंतर, सोनम ही कधी भारत, नाहीतर अमेरिकेत राहते. दरम्यान अभिनेत्रीनं तिच्या गरोदरपणाची बातमी शेअर करण्यासाठी राजकुमारी डायनापासून प्रेरित गुलाबी ड्रेस निवडला. तिची बहीण रिया कपूरनं स्टाईल स्टेटमेंटमध्ये मदत केली. आता सोनमची ही पोस्ट अनेकजण लाईक करत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेला तिच्या फोटोचेही अनेकजण कौतुक करत आहेत.

दरम्यान सोनमनं दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्या २००५ मध्ये आलेल्या 'ब्लॅक' चित्रपटातून सहाय्यक दिग्दर्शक म्हणून तिच्या कारकिर्दीला सुरुवात केली. २००७ मध्ये भन्साळींच्या रोमँटिक ड्रामा 'सावरिया'द्वारे तिनं चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. या चित्रपटामध्ये तिच्याबरोबर रणबीर कपूर मुख्य भूमिकेत होता.

अभिनेत्रीचा पहिला चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. यानंतर तिनं 'आय हेट लव्ह स्टोरीज', 'भाग मिल्खा भाग', 'संजू', 'प्रेम रतन धन पायो', 'नीरजा' आणि 'वीरे दी वेडिंग' सारख्या चित्रपटांमध्ये काम केलं. तिचे हे चित्रपट खूप गाजले. आता अनेक दिवसांपासून सोनम कपूरनं चित्रपटांमध्ये काम केलं नाही.

# 'हि-मॅन'ची एक्झिट चटका लावणारी, चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा तारा निखळला – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा लखलखता तारा निखळल्याची शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते पद्मभूषण धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

स्वप्नाळू, युवा नायक ते तडफदार-बलंदड नायक म्हणून साकारलेल्या वैविध्यपूर्ण भूमिका आणि पुढे बॉलिवुडचा हि-मॅन म्हणून लौकीक मिळवेलेले ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र चित्रपट रसिकांच्या सदैव स्मरणात राहतील, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी म्हटले आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणतात की, ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचा हिंदी चित्रपट सृष्टीतला प्रवास वैशिष्ट्यपूर्ण राहिला. कृष्ण-धवल काळ ते रंगीत आणि अलिकडच्या तांत्रिकदृष्ट्या आधुनिक प्रवाहात ते कार्यशील राहिले. ते चित्रपट सृष्टीतील बदलाचे, भरभराटीपासून ते आतापर्यंतच्या काळाचे महत्वाचे साक्षीदार राहिले. नायक म्हणून तरूण वयात सालस, स्वप्नाळू नायक ते विविध चित्रपटात वाट्याला आलेल्या भूमिका त्यांनी अभिनयाने आयकॉनिक ठरवल्या. शोले चित्रपटातील पडद्यावरील वीरू प्रमाणेच ते प्रत्यक्षातही मैत्र जपणारे होते. सहृदय आणि जुन्या-नव्या पिढीला जोडणारे, अनेकांसाठी आधार, मार्गदर्शक व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती होती. या क्षेत्रातील ज्येष्ठत्व ते तितक्याच उमद्यापणाने मिरवत असत. मध्यंतरी त्यांनी लोकसभेत खासदार म्हणून बिकानेरचे प्रतिनिधीत्व केले होते. पण त्यांनी चित्रपटसृष्टी आणि अभिनय, या क्षेत्रातील प्रयोगशीलता यांनाच अधिक प्राधान्य दिले. सुमारे तीनशेहून अधिक चित्रपटांमध्ये त्यांनी वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या. एकाच वर्षांत ९ हिट चित्रपट देण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत ते चित्रपट सृष्टीत सक्रिय राहिले. त्यांच्या निधनाने आपल्या चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा तारा निखळला आहे.

ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनामुळे देओल कुटुंबीयांसह, त्यांच्या चाहत्यांवर दुःखाचा आघात झाला आहे. आम्ही या सर्वांच्या दुःखात सहभागी असून त्यांना ईश्वराने आघात सहन करण्याची ताकद द्यावी, अशी प्रार्थना करतो. ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनामुळे चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली असून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

# झायेद खान कुटुंब साईचरणी नतमस्तक; जरीन खान यांच्या आठवणींना दिला उजाळा



**शिर्डी :** साईबाबांची शिर्डी नेहमीच भाविकांनी गजबजलेली असते. अभिनेत्री झरीन खान यांच्या निधनानंतर अभिनेता झायेद खान, त्यांची पत्नी मलाइका खान, तसंच बहीण आणि अभिनेता ऋतिक रोशन यांची पूर्वीची पत्नी सुजैन खान यांच्यासह संपूर्ण खान कुटुंबीयांनी आज साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं.

**अभिनेता झायेद खानचा लग्नाचा वाढदिवस :** अभिनेत्री झरीन खान यांचं काही दिवसापूर्वी निधन झालं होतं. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आज सहकुटुंबानं शिर्डीत साईबाबांचं दर्शन घेतलं. विशेष म्हणजे आज अभिनेता झायेद खान आणि मलाइका खानचा लग्नाचा २० वा वाढदिवस आहे. झरीन खान यांनी लग्नाच्या वाढदिवसानिमित्त घेतलेल्या रिंग मलाइका खानला झायेद यांनी त्यांच्या आईच्या प्रतिमेसमोर घालून हा दिवस साजरा केला. यावेळी संपूर्ण कुटुंब भावनिक झाले होते.

**साईबाबांच्या आरतीला लावली हजेरी :** यानंतर झायेद खान, मलाइका खान आणि सुजैन खान यांच्यासह खान कुटुंबीयांनी साईबाबांच्या माध्यन्हा आरतीला हजेरी लावली. आरतीनंतर त्यांनी झरीन खान यांची प्रतिमा साईबाबांच्या समाधीसमोर ठेवून साईंचं मनोभावे दर्शन घेतलं. यानंतर सर्व कुटुंबीयांनी मंदिर परिसरातील ध्यानमंदिरात काही काळ ध्यानधारणा केली. संस्थानच्या देणगी कार्यालयात जाऊन देणगीही अर्पण करण्यात आली. अखेरीस सर्वांनी प्रसादालयात जाऊन साईबाबांच्या प्रसादाचा लाभ घेतला.

**आईच्या प्रतिमेसमोर घातली रिंग :** साईदर्शनानंतर अभिनेता झायेद खान म्हणाले, "माझी आई झरीन खान साईबाबांची मोठी भक्त होती. ती कायम शिर्डीत येऊन आमच्या कुटुंबाच्या सुख-शांतीसाठी प्रार्थना करत होती. नेहमी आम्हाला शिर्डीत येण्यास सांगत होती. परंतु आम्हाला जमत नसे. आज आई नसली तरी तिची प्रतिमा घेऊन आलोय. त्यामुळं ती आमच्याबरोबरच आहे असं वाटतं.

# मेक्सिकोच्या फातिमा बॉशनं जिंकला मिस युनिव्हर्स २०२५चा ताज, भारताच्या मनिका विश्वकर्माच्या स्थानाबद्दल जाणून घ्या...



**मुंबई :** मिस युनिव्हर्स २०२५चा भव्य अंतिम सोहळा संपन्न झाला आहे. मेक्सिकोच्या २५ वर्षीय फातिमा बॉशनं मिस युनिव्हर्सचा ताज जिंकला आहे. ज्यूरीनं तिचं नाव जाहीर करताच, तेथील संपूर्ण वातावरणात आनंद पसरला. फातिमाला चिअर करण्यासाठी लोक अत्यानंदाने ओरडू लागले. तसेच काहींच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. सर्वत्र फक्त फातिमा, फातिमा असा जयघोष निनादत राहिला. हा विजय मेक्सिकोसाठी खूप विशेष आहे. तिनं हा ताज खूप कष्टानं मिळवला. दरम्यान स्टेजवर पाऊल ठेवणाऱ्या फातिमाच्या चेहऱ्यावर एकाच वेळी आनंद आणि चिंतेचे मिश्र भाव पाहायला मिळाले. अंतिम फेरीतील फातिमाच्या उपस्थितीने संपूर्ण वातावरण बदलून गेलं. तिनं महिलांना बोलण्यास, बदल घडवण्यास आणि एकत्र इतिहास घडवण्यास प्रोत्साहित केलं. तिनं यावेळी सांगितलं की, वर्षानुवर्षे कठोर परिश्रम आणि महिन्यांच्या तयारीमुळं ती या पदावर पोहोचले आहे. जेव्हा तिच्या डोक्यावर मुकुट ठेवण्यात आला, त्यावेळी ती अत्यंत भावनिक होती, तिच्या डोळ्यात अश्रू होते. हा क्षण तिच्यासाठी स्वप्नापेक्षा कमी नव्हता. यावेळी तिच्या बोलण्यातून आत्मविश्वास आणि उत्कटता दिसून येत होती.

**दोन आठवड्यांपूर्वी वादात सापडली :** या महिन्याच्या सुरुवातीला फातिमा बॉशला मोठ्या वादाला तोंड द्यावे लागलं. दोन आठवड्यांपूर्वी मिस युनिव्हर्सच्या होस्ट नवाट इटसाराग्रिसिल यांनी एका बैठकीदरम्यान जाहीर टीका केल्यानंतर, फातिमा बॉश नाट्यमयरित्या बाहेर पडल्याची एक बातमी समोर आली होती. लाईव्ह स्ट्रीम सत्रादरम्यान, नवाट यांनी तिचं वर्णन करण्यासाठी 'डंप हेड' हा शब्द वापरला.

# माहूर गडावरील लघु व्यवसायकांचे प्रतिष्ठान रिकामे, लिफ्ट आणि स्काय वाक च्या कामाला मिळणार गती

**दैनिक युवक आधार**
**श्रीक्षेत्र माहूर :( प्रतिनिधी) सय्यद ईसा**




माहूर गडावर केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी 51 कोटी रुपये देऊन लिफ्ट आणि स्काय वाकच्या कामाला मंजुरी दिली होती त्या अंतर्गत श्री रेणुका मातेच्या पायऱ्या चढताना उजव्या हाताला असलेले लघुव्यवसायिकाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याने प्रशासनाकडून संभाव्य पार्किंगच्या ठिकाणी गाळे निर्मिती करून त्यांना प्रतिष्ठान रिकामी करण्यात सांगण्यात आल्याने दि 24 रोजी लघु व्यावसायिकांनी तहसीलदार अभिजीत जगताप यांच्या उपस्थितीत आपले प्रतिष्ठान रिकामे करण्यास सुरुवात केल्याने लिफ्ट आणि स्काय वॉकच्या कामाला गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.श्रीक्षेत्र माहूर गडावरील श्री रेणुका माता मंदिरात येणाऱ्या वयोवृद्ध भाविकांना अडीचशे पायऱ्या चढण्या साठी त्रास होत होता सदरील बाबा केंद्रीय मंत्री नितीन जी गडकरी यांच्या लक्षात आणून दिल्याने त्यांनी भाविकांना सुविधा व्हावी भाविकांचे लवकर दर्शन व्हावे यासाठी 51 कोटी रुपये खर्चाच्या लिफ्ट आणि स्काय वॉकच्या कामाला मंजुरी दिली होती परंतु येथे पायऱ्याच्या शेजारी असलेल्या लघु व्यावसायिकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला होता त्यामुळे डाव्या बाजूकडील दरड मध्ये भराव टाकून येथे गाळे निर्मिती करण्यात आली असून त्या ठिकाणी सदरील 35 लघु व्यावसायिकाच्या स्थलांतराचा प्रश्न निकाली काढण्यात आला त्यामुळे काहीं व्यवसायिकांनीआपापले प्रतिष्ठान काढून घेण्यास सुरुवात केलेली असून काही प्रतिष्ठान रिकामे करण्यात आलेले आहेत

सदरील लिफ्ट आणि स्काय वॉक चे काम तसेच व्यवसायिकांचे स्थलांतर व इतर विकास कामे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार नांदेड जिल्ह्याचे अधीक्षक अभियंता संभाजी धोत्रे सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तुला कार्यकारी अभियंता विशाल चोपडे तसेच श्री रेणुका देवी संस्थान प्रशासन यांचे मार्गदर्शनाखाली तहसीलदार अभिजीत जगताप सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता डी के भिसे उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे पोलीस उपनिरीक्षक संदीप अन्येबोईनवाड सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बाबू जाधव क अभियंता पवन हंचाटे सहाय्यक अभियंता प्रफुल कांबळे स्थापत्य अभियंता सहाय्यक संतोष भोकरे विश्वनाथ कांबळे श्री रेणुका देवी संस्थानचे संस्थापक योगेश साबळे गुरुबक्षानि कंट्रक्शन कंपनी यांचे मार्गदर्शनाखाली होत आहे




**मेष** – आपल्या धंद्यात वाढ करू शकाल. तुमचा विचार इतरांना पटवून देता येईल. कठीण काम करा. निष्कारण वाद वाढवू नका.

**वृषभ** – नोकरीत वरिष्ठांची मदत मिळेल. नवीन काम मिळवता येईल. खर्चावर बंधने घाला. राग वाढवू नका. सर्वांशी सुसंवाद राहील.

**मिथुन** – महत्त्वाचा निर्णय घेताना सर्वांचा विचार करा. आपल्या कामातील अडचणी कमी होतील. अरेरावी करू नका. नेहमी नम्रपणे बोला.

**कर्क** – महत्त्वाची रेंगाळलेली कामे होतील. उत्साह वाढेल. नाराज झालेल्यांना खूश करता येईल. धंदा वाढेल. प्रकृतीची काळजी घ्यावी.

**सिंह** – अनुभवी माणसांचा सल्ला उपयोगी येईल. सर्वांचे सहाय्य घेता येईल. मोठ्यांचा मान राखा. मैत्री होईल. सावधपणे गुंतवणूक करावी.

**कन्या** – गैरसमज टाळण्याचा प्रयत्न करावा. आपला प्रभाव पडेल. आपल्या धंद्यात वाढ होईल. भागीदाराबरोबर चर्चा यशस्वी होईल.

**तूळ** – आर्थिक स्थिरता लाभेल. अनेक कामे करण्याचा प्रयत्न त्रासदायक ठरेल. मनाची द्विधा अवस्था होईल. वेळेनुसार निर्णय घ्या.

**वृश्चिक** – व्यवसायात अनुकूल ग्रहमान राहील. अडचणींवर मात करू शकाल. नवीन संधी उपलब्ध होतील. आपल्या रागावर ताबा ठेवावा.

**धनु** – व्यवसाय, नोकरीत प्रतिष्ठा प्राप्त होईल. नवीन योजना राबवता येतील. नवीन ओळख झाली तरी मोहात पडू नका. सावध राहा.

**मकर** – कामात तत्परता दाखवाल. आपला प्रभाव पडेल. स्पर्धा जिंकता येईल. ओळखी वाढतील. वसुली करा. भावंडांशी वादविवाद टाळावेत.

**कुंभ** – कौटुंबिक समस्या सोडवाल. नातेवाईकांशी, आप्तेष्टांशी भेटीचे योग आहेत. कुणालाही कमी लेखू नका. तुमचे विचार योग्य ठरतील.

**मीन** – धंद्यात फायद्याचे काम मिळेल. कुठल्याही स्वरूपाचे वादविवाद टाळावेत. चर्चा यशस्वी

## श्रीवर्धन स्मशानभूमीत अंधार, अरुंद जागा आणि अस्वच्छतेची समस्या; मोबाईलच्या प्रकाशात पार पडले अंत्यविधी

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन.प्रतिनिधी :**
श्रीवर्धन शहरातील स्मशानभूमी परिसरातील सुविधांचा अभाव दाखवणारी घटना काल समोर आली. परिसरात पुरेसा उजेड नसल्यामुळे आणि आवश्यक जागा उपलब्ध नसल्याने स्थानिक नागरिकांना अंत्यविधी मोबाईलच्या प्रकाशात पार पाडावा लागला. अशा स्थितीत अंत्यसंस्कार करताना उपस्थित नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागल्याचे दिसून आले.स्मशानभूमी परिसरात ना



प्रकाशव्यवस्था, ना आवश्यक स्वच्छता, तसेच मार्गावरील अंधारामुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण होते. अनेक वेळा तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कामे झालेली नाहीत, अशी खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. नगरपालिकेने स्मशानभूमीतील प्रलंबित विकासकामे युद्धपातळीवर पूर्ण करून, लाईट व्यवस्था, स्वच्छता, आणि इतर मूलभूत सोयी तत्काळ उपलब्ध करून द्याव्यात, अशी ठाम मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

अंत्यविधीसारख्या गंभीर प्रसंगी तरी योग्य सुविधा मिळायला हव्यात.

# प्रा. प्रितम मुळे यांना रसायनशास्त्र विषयात पीएचडी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :** येथील इंद्रराज कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागात कार्यरत असलेले सहाय्यक प्राध्यापक प्रितम मुळे यांना नुकतीच विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखे अंतर्गत रसायनशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पी. एचडी.) पदवी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने घोषित करण्यात आली. प्रा. मुळे यांनी "सपोरटेड झिर्कोनिया बेस्ड सॉलिड ऍसिड कॅटलिस्टस देयेर



क्यारॅक्टरायझेशन अँड ॲप्लिकेशनस्" या विषयावरील शोध प्रबंध धाराशिव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप- परिसरातील असोसिएट प्रोफेसर डॉ. मेघश्याम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला होता.

त्यांचे वडील आप्पाराव मुळे, आई सुजाता मुळे, संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार उत्तमसिंह पवार, सचिव अशोक देवरे, प्राचार्य डॉ. जी. जी. राजपूत, उप-प्राचार्य डॉ.व्ही. बी.लांब व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# आज चिखलीत 25 नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा

## नगरअध्यक्ष निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराला वेग

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी चिखली सिद्धार्थ धंदरे**
**चिखली :** चिखली नगरपालिका भारतीय जनता पक्षाचे नगरअध्यक्ष पदाचे उमेदवार पंडितराव देशमुख यांच्या प्रचारार्थ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज, सोमवारी दि.. २५ नोव्हेंबरला राजा टॉवर येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

सभेला हजारोंच्या संख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन आमदार श्वेताताई महाले यांनी केले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे.

आमदार श्वेताताई महाले यांच्या नेतृत्वाखालील नियोजनबद्ध आणि प्रभावी प्रचार यंत्रणेला मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमुळे मोठे राजकीय बळ मिळणार आहे. 'चिखलीचा विकास साधण्यासाठी आणि शहराला राज्यातील प्रमुख शहरांच्या पंक्तीत बसवण्यासाठी नगराध्यक्ष भाजपचाच हवा' हा संदेश मतदारांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या मोठ्या नेत्याची उपस्थिती मतदारांना थेट विकासाच्या आश्वासनाचे आणि राज्य सरकारच्या पाठबळाचे प्रतीक म्हणून दिसत आहे. पंडितराव देशमुख यांनी नुकत्याच एका मुलाखतीत, निवडून आल्यास नगरपालिकेच्या शाळा डिजिटल करून सीबीएसई पॅटर्न सुरू करण्याचे महत्त्वाचे आश्वासन दिले आहे. हे पाऊल शहराच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरू शकते.

यासोबतच, आमदार श्वेताताई महाले यांच्या नेतृत्वाखाली मंजूर झालेली १३२ कोटींची महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजना शहराचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.



**'विकासकन्या' श्वेता महालेंच्या प्रयत्नांना नवी दिशा....**

मागील काही वर्षांत आमदार श्वेताताई महाले यांनी चिखली आणि परिसराच्या विकासासाठी अनेक मोठे प्रकल्प मंजूर करून 'विकास कन्या' अशी आपली प्रतिमा मजबूत केली आहे. त्यांच्या याच प्रतिमेमुळे आणि निवडणुकीतील शिस्तबद्ध प्रचारामुळे भाजपच्या प्रचाराला आधीच एक मजबूत आधार मिळाला होता. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीमुळे त्यांच्या कामाला आता अधिक मोठी राजकीय धार मिळणार आहे. शहराला केवळ स्थानिक नेतृत्वाचाच नव्हे, तर थेट राज्याच्या नेतृत्वाचा पाठिंबा आहे. नगराध्यक्ष सत्ताधारी पक्षाचा असेल तर आमदार आणि नगराध्यक्ष यांच्यात समन्वय साधून शहराच्या विकासाची प्रक्रिया अधिक जलद होते. शहरातील रस्ते, पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि पाणीपुरवठा या मूलभूत समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी भाजपच्या नगराध्यक्षाची गरज आहे, अशी भावना शहरात वाढत आहे.मुख्यमंत्र्यांच्या सभेमुळे भाजपला केवळ राजकीय बळ मिळणार नाही, तर शहरातील तरुणाई आणि मध्यमवर्गीयांना आकर्षित करण्याची संधी मिळेल. तरुण मतदारांसाठी शिक्षण आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी नगरपालिका सक्षम असणे आवश्यक आहे, यावर भाजप भर देत आहे. पंडितराव देशमुख यांच्या उमेदवारीला मुख्यमंत्र्यांचे वजन मिळाल्याने, चिखली नगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच विकासाचे नवे पर्व सुरू होण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आजची सभा चिखली नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीतील 'टर्निंग पॉइंट' ठरणार आहे. आमदार श्वेताताई महाले यांनी चिखलीतील नागरिकांना या महत्त्वाच्या सभेला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून आपला पाठिंबा दर्शवावा, असे आवाहन केले आहे.

## सुनील मांगुळकर यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :** तालुक्यातील अंभई येथील सुनील मांगुळकर यांची माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीच्या सिल्लोड तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. समितीचे राज्याध्यक्ष महेश सारणीकर ,छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्ष डॉ. विलास दांडगे व सिल्लोड तालुका अध्यक्ष योगेश पालोदकर यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.



# शिवसेनेतर्फे शाखा तिथे संविधान अभियान

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** शिवसेना पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून येत्या २६ नोव्हेंबर या " भारतीय संविधान दिना" पासून "शाखा तिथे संविधान" हे अभियान राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

या अभियानामागे संविधानाची मूल्य लोकांच्या मध्ये पोहचवणे आणि महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात्मकते प्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा मुख्य हेतू आहे.

या अभियानाचा शुभारंभ २५ नोव्हेंबर २०२५ सायंकाळी ५ वाजता पक्षाच्या नेत्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती नीलमताई गोरे यांच्या शुभहस्ते आणि शिवसेना नेत्यांच्या उपस्थितीत शिवसेनेचे मध्यवर्ती कार्यालय - बाळासाहेब भवन, मुंबई येथून होणार आहे. त्यानंतर हे अभियान संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्याची संकल्पना आहे. "शाखा तिथे संविधान' या अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व शिवसेनेच्या शाखा आणि कार्यालयात संविधानाची उद्देशिके ( प्रस्ताविका ) ची प्रतिमा लावण्याचा संकल्प करून व सोबत भारतीय संविधानाची प्रत प्रत्येक शाखेत ठेवण्यात येणार असेही उद्देश्य आहे.

'शाखा तिथे संविधान' या अभियानाच्या अंतर्गत भारतीय संविधानाची मूल्य आणि महत्व लोकांच्या मध्ये विस्तारित करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

१) संविधान बाग -- महाराष्ट्रात शिवसेना आणि सरकारच्या माध्यमातून संविधान बाग विकसित करण्यात येईल जिथे संविधान बनविण्याच्या प्रक्रियेत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेले परिश्रम हे अधोरेखित करण्यात येईल त्याच सोबत २८८ सदस्य असलेल्या विधानसभेत ज्यात दहा महिलांचा समावेश होता यांसर्वांचा परिचय.

संविधानची महत्वाची मूल्ये आणि सर्व सामान्य लोकांच्या साठी असलेल्या तरतुदीचे फलक लावण्यात येतील.

२) रेल्वे आणि बस स्थानकात संविधान प्रेरणा स्थळ – दररोज बस आणि रेल्वेने लाखो लोक प्रवास करतात त्या रेल्वे स्टेशन वर राज्य परिवहन व रेल्वेच्या अनुमतीने संविधान प्रेरणा

संविधान बाग – शाखा तिथे संविधान या अभियानाच्या अंतर्गत नव्या पिढीला संविधानाची ओळख व्हावी यापद्धतीने संविधान बाग विकसित केली जाईल, ज्या बागेत गेल्यावर सर्व सामान्य व्यक्तीला संविधान कसे तयार झाले, त्याची ठळक वैशिष्ट्ये काय आहेत हे समजून येईल.

३) बस थांबा आणि रेल्वे स्टेशन येथे संविधान जागृती – रेल्वे मंत्रालया कडून आणि राज्य परिवहन मंडळा कडून अनुमती घेऊन काही रेल्वे स्टेशन वर संविधानाची वैशिष्ट्य आणि सांविधानिक मूल्य लिहून सुशोभित केली जातील . या अभियान अंतर्गत पक्षाचे नेते आणि संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून रेल्वे मंत्रालयाकडे देशातील सर्व रेल्वे स्टेशन मध्ये संविधानाची प्रस्ताविका लावून संविधान जागृती करण्याचा प्रस्ताव पाठवून मागणी केली जाईल.

४) संविधान संग्रहालय – देशातील एका महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकात जागतिक संविधान संग्रहालय निर्माण करण्यात येईल असा मानस आहे. ज्या ठिकाणी भारतीय संविधाना सोबत जगातील सर्वच राज्यघटना असतील ज्यामुळे अभ्यासक, विचारवंत लोकांना संविधानाचा अभ्यास करता येईल.

५) सन्मान सोहळा

संविधानाचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ता,कार्यकर्ता, साहित्यिक, गायक, पत्रकार, कलावंत, शिल्पकार यांचा संविधान गौरव पुरस्कार देवून सन्मान करण्यात येईल

यासोबत वेळोवेळी पक्ष आणि कार्यकर्त्यांकडून संविधान प्रचार आणि जागृतीच्या अनुषंगाने जे उपक्रम सुचविण्यात येतील ते देखील येणाऱ्या काळात याअभियानात समाविष्ट करण्यात येतील.

# प्रभाग कृमांक १२ चे सर्वांगीण विकास हेच माझे उद्धीष्ट – सौ शुभांगी बिरादार

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी: महादेव उप्पे**
**देगलूर(दि.२५)** देगलूर नगर परिषदेच्या निवडणुकीत दिवसेंदिवस उत्सुकता वाढत आहे.प्रभागातील उमेदवार आपापल्या परीने मतदारांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करीत आहेत.काही उमेदवार आपण केलेल्या कामांचा पाढा वाचवून दाखवत आहेत तर काही उमेदवार अर्थपूर्ण व्यवहारातुन विजयी माळ आपल्या गळ्यात कशी पडेल याची गणित लावण्यात मग्न आहे.मात्र या सर्वांना अपवाद ठरत आहेत तो म्हणजे प्रभाग क्रमांक 12 मधील सौ.शुभांगी जनार्दन बिरादार यांचा. कारण प्रभाग कृमांक 12 मधील धडाकेबाज प्रचार मोहिमेने उमेदवारात एक नवचैतन्य निर्माण झाले आहे.पुढील दृष्टिकोन



समोर ठेवून आजतागायत केलेल्या समाज उपयोगी कार्याचा कोणताच पाढा न वाचता सदैव जनतेसाठी समर्पित असल्याचे चित्र प्रभाग कृमांक 12 मध्ये या उमेदवाराने निर्माण केले आहे.शिवाय प्रभाग क्रमांक 12 मधील जनतेनेही भरभरून मताद्वारे प्रेम देण्याचे ठरविले असल्याचे प्रचार मोहिमेतून दिसून येत आहे. शिवाय न भूतो न भविष्य असा विकास योद्धा म्हणून आम्हाला उमेदवार मिळाला असल्याचे यावेळी कसलाच विचार न करता आम्ही सौ.शुभांगी जनार्दन बिरादार यांना भरघोस मतांनी विजयी करणार असल्याचेही प्रभाग क्रमांक 12 मधील जनतेतून बोलले जात आहे.सौ.शुभांगी यांचे पती जनार्दन बिरादार हे सुद्धा देगलूर नगरीत तरुणांच्या गळ्याचे ताईत मानले जातात.म्हणूनच की काय एकंदरीत सौ. शुभांगी बिरादार ह्या विजयी पताका फडकावतील यात दुमत नसल्याचेही प्रभागातील जनतेतून बोलले जात आहे.

## एरंडोल नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 अंतर्गत पथनाट्यामार्फत मतदानाचे महत्त्व सादरीकरण

**दैनिक युवक आधार**
**जळगाव प्रतिनिधी : एरंडोल:** एरंडोल नगर परिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर, SVEEP (सिस्टिमॅटिक व्होटर्स एज्युकेशन अँड इलेक्टोरल पार्टिसिपेशन) कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृतीचा एक अभिनव उपक्रम राबवण्यात आला.

दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी एरंडोल नगरपरिषद आणि समर्थ बहुउद्देशीय संस्था, जवखेडे यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात पथनाट्याचे यशस्वी सादरीकरण करण्यात आले. मतदारांना त्यांच्या हक्कांबद्दल आणि मतदानाचे लोकशाहीतील महत्त्व समजावून सांगणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

प्रमुख ठिकाणी सादरीकरण शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या ठिकाणी या पथनाट्याचे



सादरीकरण करण्यात आले, ज्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत मतदानाची जाणीव पोहोचली.

बसस्थानक परिसर
म्हसावद नाका परिसर
बुधवार दरवाजा परिसर
जुनी नगरपालिका परिसर

या सर्व ठिकाणी नागरिकांनी पथनाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत, मतदानाचे महत्त्व जाणून घेतले.

**पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व परिश्रम**

या जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन मा. श्री प्रदीप पाटील, निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार, एरंडोल आणि मा. श्री अमोल बागुल, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्यधिकारी, नगरपरिषद एरंडोल, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

पथनाट्य यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी स्वीप कक्षाचे नोडल अधिकारी तथा पुरवठा निरीक्षण अधिकारी श्री विवेक वैराळकर यांच्यासह श्री महेंद्र पाटील (सहाय्यक प्रकल्प अधिकारी, नगरपरिषद एरंडोल), श्री सचिन पाटील (सहाय्यक कृषी अधिकारी, एरंडोल) आणि श्री दीपक बनसोडे (भूकर मापक, एरंडोल) यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी, लोकशाहीच्या या उत्सवात नागरिकांनी सक्रिय सहभाग घेऊन १०० टक्के मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केले.

## माजी आ. एड. विजयराव जाधव यांनी महसूल मंत्री मा ना श्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांचे मालेगाव नगरीमध्ये स्वागत केले

**दैनिक युवक आधार**
**रणजितसिह. ठाकूर :** मालेगाव नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार नागेश बळी आणि नगरसेवक पदाचे १७ उमेदवार यांच्याकरिता आयोजित सभेस मा. ना. श्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या सभेला खा. अनुपभाऊ धोत्रे, आ. शामभाऊ खोडे, पुरुषोत्तमजी चितलांगे, राजू पाटील राजे, कविताताई खराट, मा. आ. पुरुषोत्तमजी राजगुरू,



डॉ. विवेकजी माने, गणेशभाऊ खंडाळकर, सुरेशभाऊ मुंढे, गणेशभाऊ कुटे, मनीषजी मंत्री, किशोरजी महाकाळ, मोहनजी बळी, इमदाद भाई तसेच नगराध्यक्ष पदाचे उमेदवार नागेश बळी आणि सर्व १७ नगरसेवक पदांचे उमेदवार उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात झालेली ही प्रचारसभा कार्यकर्त्यांमध्ये नवी ऊर्जा आणि विजयाचा दृढ संकल्प निर्माण करणारी ठरली.

## दादासाहेब कन्नमवारांचे कार्य दिशादर्शक – पद्मश्री दादासाहेब इदाते

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** बहुजन नायक म्हणून मा. सा कन्नमवार यांचे कार्य अद्वितीय असून अनेकांना जगण्याची उमेद देणारे आहे. माणूस परिस्थितीने हरला तरी भविष्याच्या उमेदीने विश्वासपूर्वक उभा राहिला तर नक्कीच यशस्वी होतो. कन्नमवारांनी प्रत्येक कार्य आव्हान म्हणून स्विकारले म्हणून अपयश कधी प्राप्त झाले नाही. त्यामुळे प्रत्येकाने कन्नमवारांपासून प्रेरणा घेऊन जीवन जगावे असे आवाहन निती आयोगाचे सदस्य पद्मश्री दादासाहेब इदाते यांनी केले.

नागपूर विधानभवन परिसरात बेलदार समाज संघर्ष समितीतर्फे माजी मुख्यमंत्री कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांची ६३ वी पुण्यतिथी आज (ता २४) साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निती आयोगाचे सदस्य पद्मश्री दादासाहेब इदाते उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून खापरखेडा, कोराडी औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पाचे मुख्य अभियंता श्री गिरीश कुमरवार, मुख्य अभियंता श्री श्याम राठोड, माजी गृहमंत्री श्री अनील देशमुख, शिक्षक नेते श्री मिलिंद वानखेडे, विधान भवन कक्ष अधिकारी श्री कैलास पाझारे, कक्ष श्रीमती स्नेहलता खोब्रागडे श्री प्रवीण कुंटे जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी पक्ष पवार गट उपस्थित होते.



प्रथमतः दादासाहेब कन्नमवार यांच्या पुर्णाकृती पुतळयाला व प्रतिमेला पुष्पहार घालून माल्यार्पण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी दादासाहेब कन्नमवार यांच्या पावन स्मृतीस अभिवादन करुन त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बेलदार समाज संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री राजेंद्र बढिये यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन श्री मुकुंद अडेवार यांनी तर उपस्थितांचे आभार श्री खिमेश बढिये यांनी मानले. कार्यक्रमात नागपूर महापालिकेचे कार्यक्रम समन्वयक अधिकारी श्री मनीष सोनी, श्री युवराज मोहिते श्री खिमेश बढिये, श्री अण्णाजी गुंडलवार, प्राचार्य डॉ गजानन पाटील श्री मुकुंद अडेवार, श्री विनोद आकुलवार, श्री दिनेश गेटमे, श्री किशोर सायगन,श्री प्रविण कुंटे, श्री उमेश कोराम, श्री धीरज भिसिकर, श्री सुभाष बोर्डेकर, श्री अरुण आकुलवार, श्रीमती सुनीता दाभाडे, श्री मिथुन खेरडे, श्री उमेश पारकर, श्री सुदाम राठोड, श्री वैभव बढिये, श्री संजय माटे नामदेवराव भारसकडे चंद्रकांत बरगट साहेब यांच्यासह बेलदार समाज बांधव व भटक्या विमुक्त चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले   उपसंपादक - श्री विलास गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश पाटील   सह संपादक - श्री मुकुंद कांबळे   महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3   अंक : ७७   मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : ८   RNI MAHMAR/2023/89514

त्वरित पत्रकार पाहिजेत !
महाराष्ट्र व देशासह जगभरात
डिजिटल माध्यमातून
पोहचणारे दैनिक
PRESS
दैनिक युवक आधार मराठी
तरुणांचा बुलंद आवाज
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, तालुका,
जिल्हा परिषद सर्कल, लोकसभा,
विधानसभा या क्षेत्रांमध्ये पत्रकार पाहिजेत
अधिक माहिती साठी संपर्क
श्री संतोष शिवदास आमले
संपादक - ९२२०४०३५०९



जय भारत...   जय संविधान...

# मैत्री संस्था, उत्प्रेरक फाउंडेशन, जनहित फाउंडेशन व सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती

आयोजित



## भारतीय संविधान दिनाच्या गौरवशाली अमृत महोत्सव वर्ष पूर्ती निमित्त..




सामूहिक संविधान सारनामा वाचन व संविधानाचे शिल्पकार महामानव **प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर** व **माता रमाई**

२२ वर्ष ज्या घरात, वास्तव्यास होते जेथे, लोकराजा राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भेटण्यासाठी आले होते त्या परळ, येथील, बी.आय.टी चाळीतील, घराला अभिवादन तसेच या ऐतिहासिक वास्तूला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा मिळावा अशी जाहीर मागणी याप्रसंगी करण्यात येणार आहे.

**बुधवार दि. २६ नोव्हेंबर २५ रोजी, सायं.ठीक ४.०० वाजता**

विशेष उपस्थिती :- **मा. अनिकेत मनोज संसारे** (युवा नेते, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष)

-: प्रमुख अतिथी :-

**मा. शंकर लोखंडे** : (अध्यक्ष : डॉ बाबसाहेब आंबेडकर प्रेरणा समिती)

**मा.मोहन जाधव** : (कवी, लेखक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अंगरक्षक बाबुराव जाधव यांचे चिरंजीव)

**मा. निशाताई जाधव** : (माता रमाई यांची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री व सामाजिक कार्यकर्त्या)

समारंभ अध्यक्ष :- **मा. सुरज भोईर** (अध्यक्ष : मैत्री संस्था )

सूत्रसंचालन :- **मा. गुरुदत्त वाकदेकर** (कवी व पत्रकार)

**आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे...**

**स्थळ : संविधान स्तंभ ,बी. आय. टी. चाळ क्र: १, विठ्ठल चव्हाण मार्ग, दामोदर हॉल शेजारील गल्ली, परळ, मुंबई - ४०० ०१२.**

-: निमंत्रक :-

**मा. डॉ .संतोष कांबळे** (उत्प्रेरक फाउंडेशन) **मा. मुकुंद कांबळे** (जनहित फाउंडेशन) **मा. सुरेश साळवी / मा. विजय केदासे** (सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती) **मा. विनायक जवळेकर** (मुक्त पत्रकार) **मा. डॉ. प्रभाकर कांबळे** (पत्रकार व सामाजिक कार्यकर्ता) **मा. मनिषा मांढरे** (आदर्श शिक्षिका व सामाजिक कार्यकर्ता) **मा. संतोष खरटमोल** (कवी व सामाजिक कार्यकर्ते) **मा. साई रामपूरकर** (विक्रमी रक्तदाते व मुक्त पत्रकार) **मा. किरण डवले** (सामाजिक कार्यकर्ता) **मा. ॲड.सोपान बुडबाडकर** (लेखक) **मा. मुस्तफा शेख** (सामाजिक कार्यकर्ता) **मा. विजय भोसले** (सामाजिक कार्यकर्ता) **मा. अमेय भोसले** (सामजिक कार्यकर्ता) **मा. राजेंद्र कांबळे** (गुणवंत कामगार व सामाजिक कार्यकर्ते) **मा. सचिन गमरे** (सामाजिक कार्यकर्ता) व **सर्व संविधान प्रेमी.....**

**संपर्क: 9969686014 / 8422094680**   माध्यम सहकार्य : विशाल महाराष्ट्र   Youtub Channel